cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-७४ | बुधवार दि.०३ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### कांद्याच्या अश्रूंना न्याय कधी?

रडवणे हा कांद्याचा नैसर्गिक गुणधर्म असला तरी कांदा पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर मात्र समाधानाचे हास्य असावे, अशी अपेक्षा असते. दुर्दैवाने भारतातील, विशेषतः महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वाट्याला गेल्या अनेक वर्षांपासून हसू नव्हे तर अश्रूच अधिक येत आहेत. यंदाही कांद्याच्या दरातील घसरण, हमीभावावरील वाद आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे लाखो शेतकरी आर्थिक संकटाच्या विळख्यात सापडले आहेत.

# महाराष्ट्रात ऐतिहासिक कर्जमाफी!

## २ लाखांपर्यंत कर्जमाफीला मंत्रिमंडळाची मंजुरी; ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार लाभ

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत राज्य मंत्रिमंडळाने २ लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्ज माफी योजनेला मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार असून, त्यांच्यावरील कर्जाचा मोठा भार कमी होणार आहे. मात्र, विधान परिषद निवडणुकीसाठी लागू असलेल्या आचारसंहितेमुळे या निर्णयाची अधिकृत घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही. मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी निवडणूक आयोगाच्या अटींचा उल्लेख करत सरकारला तातडीने घोषणा करता येणार नसल्याचे स्पष्ट केले होते.**



राज्य सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'अंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्यात येणार आहे. याशिवाय, नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याच्या प्रस्तावालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. या संपूर्ण योजनेसाठी राज्य शासनावर सुमारे ३६ हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. कृषी क्षेत्राला चालना देणे, शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्रदान करणे आणि कर्जबाजारीपणातून ▶▶ पान २ वर

### लाडकी बहीण प्रमाणे कर्जमाफीचा खेळ मांडू नका - राजू शेट्टीं

शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेणे, पण त्याची घोषणा करु शकत नसल्याचे कारण पुढे करणे, ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका महाराष्ट्रातील बळीराजाच्या डोळ्यात धूळ फेकणारी आहे, असा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केला आहे. लाडकी बहीण योजनेसारखा कर्जमाफीचा खेळ मांडू नका, असेही त्यांनी म्हटले आहे. सरकारने वाजत गाजत लाडकी बहीण योजना जाहीर केली. आता अनेक बहिणींना त्यातून वगळ्यास सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे गुपचूप कर्जमाफी योजना राबवून अनेक पात्र शेतकऱ्यांना अपात्र करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही हे खपवून घेणार नाही. कर्जमाफीसाठी ३० जून ही अंतिम तारीख आहे. त्यानंतर महाराष्ट्रात आंदोलनाचा भडका उडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

## थोडक्यात...

### ममता बॅनर्जी यांचा लढू किंवा मरू चा निर्धार

कोलकाताः तृणमूल कॉंग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी मध्य कोलकात्यात धरणे आंदोलन करत भाजपवर तृणमूल नेत्यांवर हल्ले केल्याचा आणि पक्षाला धमकावल्याचा गंभीर आरोप केला आहे. पश्चिम बंगाल निवडणुकीतील पराभवानंतर ममता बॅनर्जींचे हे रस्त्यावरील राजकारणात पुनरागमन मानले जात आहे. मात्र, पक्षात फूट पडण्याच्या चर्चांदरम्यान या आंदोलनाला पक्षाच्या ८० पैकी केवळ पाचच आमदारांनी हजेरी लावल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. बंगाल निवडणुकीतील पराभवानंतर आपल्या पहिल्याच मोठ्या आंदोलनाद्वारे स्ट्रीट फायटर अवतारात परतलेल्या ममता बॅनर्जी यांनी ''लढू किंवा मरू'' असा निर्धार व्यक्त केला. यावेळी त्यांनी भाजपवर त्यांचा पुतण्या अभिषेक बॅनर्जी यांच्यासह पक्षाच्या इतर नेत्यांवर हल्ले केल्याचा आणि त्यांना धमकावल्याचा आरोप केला.

### सीबीएसईचे अध्यक्ष आणि सचिवांची बदली

दिल्लीः सीबीएईच्या ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणालीवरून निर्माण झालेल्या वादानंतर केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. मंडळाचे अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांची बदली करण्यात आली आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. कॅपॅसिटी बिल्डिंग कमिशनच्या अध्यक्षा एस. राधा चौहान या समितीच्या प्रमुख असतील. त्या या प्रकरणाची सखोल चौकशी करून सरकारला अहवाल सादर करणार आहेत. वृत्तांनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणाची दखल घेतल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. तसेच आणखी काही अधिकाऱ्यांवरही कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सीबीएसई ने यावर्षी बारावीच्या पुनर्मूल्यांकनासाठी पूर्णपणे डिजिटल ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणाली सुरू केली होती. मात्र, अनेक विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकांच्या चुकीच्या स्कॅन प्रती मिळाल्याच्या, काही पाने गायब असल्याच्या तसेच इतर विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका मिळाल्याच्या तक्रारी केल्या होत्या.

### भीमाशंकर मंदिर १५ जूनपासून खुले


मंचरः तब्बल पावणेपाच महिन्यांपासून बंद असलेले श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर १५ जूनपासून भाविकांसाठी पुन्हा खुले होणार आहे. मंदिर प्रशासनाने दर्शनासाठी ऑनलाइन नोंदणी व्यवस्था सुरू केली आहे. त्याद्वारे दररोज १ हजार भाविकांना दर्शन मिळणार आहे. ५ जूनपासून नोंदणी प्रक्रिया सुरू होणार आहे. भाविकांना मंदिराच्या अधिकृत संकेतस्थळावरून नोंदणी करून दर्शन घेता येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, १५ ते ३० जून या कालावधीत ऑनलाइनद्वारे नोंदणी केलेल्या भाविकांना दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत दर्शनाची सुविधा उपलब्ध राहणार आहे. सकाळी ११ वाजल्यानंतर दर्शन बंद करून विकासकामे सुरू केली जातील. निर्धारित वेळेत दररोज केवळ १ हजार भाविकांना प्रवेश दिला जाणार आहे. नोंदणी केलेल्या भाविकांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दर्शनासाठी येताना वैध ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे.

# पेट्रोल-डिझेल आणखी महागणार

## क्रिसिलच्या अहवालाने वाढवली चिंता, अन्नधान्यापासून अनेक वस्तू महाग होण्याची शक्यता

दिल्ली । वृत्तसंस्था

नागरिकांच्या खिशाला आणखी एक महागाईचा फटका बसण्याची शक्यता आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये झालेली वाढ येत्या काळात आणखी वाढू शकते, असा अंदाज रेटिंग एजन्सी क्रिसिलने व्यक्त केला आहे. याचा थेट परिणाम वाहतूक खर्चावर होणार असून, अन्नधान्यापासून ते इलेक्ट्रॉनिक वस्तूंपर्यंत अनेक वस्तू महाग होऊ शकतात.





क्रिसिलच्या अहवालानुसार, १५ मेनंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर सुमारे ७.५ रुपयांची वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती उच्च पातळीवर कायम राहिल्यास ही वाढ १० रुपयांपर्यंत जाऊ शकते. इंधन दरवाढीचा सर्वात मोठा परिणाम महागाईवर होतो. कारण देशातील बहुतांश मालवाहतूक रस्ते मार्गाने केली जाते. भारतातील जवळपास ७१ टक्के मालवाहतूक ट्रक आणि इतर वाहनांद्वारे होते. त्यामुळे डिझेल महाग झाल्यास वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम थेट ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रच्या दोन बसचा गुजरातमध्ये अपघात; ७ प्रवाशांचा होरपळून मृत्यू

सुरत । वृत्तसंस्था

गुजरातमधील सुरत जिल्ह्यात मंगळवारी अत्यंत भीषण अपघात घडला. महाराष्ट्र एसटी महामंडळाच्या दोन बसची समोरासमोर जोरदार धडक झाल्यानंतर एका बसने पेट घेतल्याने किमान सात प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.



हा अपघात माणेकपूर गावादरम्यान धुळे-सुरत महामार्गावर घडला. धुळ्याहून नवापूरमार्गे सुरतच्या दिशेने जाणारी एसटी बस (एमएच १८ बीझेड १२५८) आणि समोरून येणारी दुसरी एसटी बस (एमएच २० बीएल ३३९०) समोरून येत होती. यांच्यात जोरदार धडक झाली. धडकेनंतर एक बस महामार्गावर ▶▶ पान २ वर

# आणखी ६० लाख लाडक्या बहिणींची नावे वगळणार!

## अंबादास दानवे यांचा खळबळजनक दावा, आदिती तटकरेंच्या राजीनाम्याची मागणी



मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहीण' योजनेवरून पुन्हा एकदा राजकारण तापले आहे. केवायसी प्रक्रिया आणि इतर कारणांमुळे सुमारे ८० लाख महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी आणखी ५० ते ६० लाख महिलांना योजनेतून वगळले जाऊ शकते, असा दावा करत खळबळ उडवून दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र याबाबत स्पष्टीकरण देताना, केवायसी न केल्यामुळे लाभार्थींची नावे तात्पुरती वगळली गेली असून त्यांना पुन्हा एकदा प्रक्रिया पूर्ण करण्याची संधी दिली जाणार असल्याचे सांगितले आहे. कोणत्याही पात्र महिलेला योजनेपासून वंचित ठेवण्याचा सरकारचा हेतू नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अंबादास दानवे यांनी सरकारवर गंभीर आरोप करत महिला व बालविकास ▶▶ पान २ वर

# सोलापुरमध्ये कॉंग्रेस उमेदवाराचा अर्ज बाद

सोलापुर । प्रतिनिधी

राज्याच्या विधान परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून कॉंग्रेसला मोठा आणि मानहानीकारक धक्का बसला आहे. कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांचा उमेदवारी अर्ज अखेर छाननीदरम्यान अवैध ठरवून बाद करण्यात आला आहे. सोलापूरचे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस.कार्तिकेयन यांनी कायदेशीर पडताळणीनंतर हा मोठा निर्णय दिला आहे. ▶▶ पान २ वर

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष करत राहणार-सपकाळ

## महाविकास आघाडीने पुणे-नाशिक महामार्ग रोखला



पुणे । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांनी रक्ताचे पाणी करून मोठ्या कष्टाने पिकविलेला कांदा कवडीमोल दराने विकावा लागत आहे. कांद्याला प्रति किलो दोन रुपयेही दर मिळत नाही. केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कांदा उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. कांद्याला तीन हजार रुपये प्रति क्विंटल भाव व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष व महाविकास संघर्ष करत राहील असा निर्धार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.**

कांद्याला ३ हजार रुपये हमीभाव मिळावा, कमी भावात विकलेल्या कांद्याला अमुदान द्यावे, शेतकऱ्यांचा सर्व कांदा नाफेडमार्फत खरेदी करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशा विविध मागण्यांसाठी मंगळवारी महाविकास आघाडीने पुण्याच्या आंबेगाव तालुक्यात पुणे नाशिक महामार्गावर रास्ता रोको आंदेलन केले. पोलिसांकडून धरपकड सुरु असतानाही हजारो शेतकरी रस्त्यावर उतरले होते. या आंदोलनात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खा. निलेशजी लंके, आ. बापूसाहेब पठारे, शिवसेना उबाठा पक्षाचे आमदार बाबाजी काळे, माजी आ. अशोकबापू पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष ▶▶ पान २ वर


## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०२ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू:९६.०० क्विंटल | १,९०० | २,४८० | २,२५० |
| ज्वारी/हायब्रिड: १०७.५० क्विंटल | २,००० | ३,७२१ | २,५३५ |
| मका/लोकल: ३०.०० क्विंटल | २,०१८ | २,०१८ | २,०१८ |
| तूर : १४.५० क्विंटल | ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| उडीद : -- क्विंटल | -- | -- | -- |
| बाजरी: ५८.०० क्विंटल | १,८०० | २,४६६ | २,३०२ |
| मुग: ८.०० क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| हरभरा: ४८.५० क्विंटल | ४,५०० | ५,७२९ | ५,३९२ |




cmyk

## अग्रलेख

# कांद्याच्या अश्रूंना न्याय कधी?

रडवणे हा कांद्याचा नैसर्गिक गुणधर्म असला तरी कांदा पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर मात्र समाधानाचे हास्य असावे, अशी अपेक्षा असते. दुर्दैवाने भारतातील, विशेषतः महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वाट्याला गेल्या अनेक वर्षांपासून हसू नव्हे तर अश्रूच अधिक येत आहेत. यंदाही कांद्याच्या दरातील घसरण, हमीभावावरील वाद आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे लाखो शेतकरी आर्थिक संकटाच्या विळख्यात सापडले आहेत.

भारत हा जगातील सर्वात मोठा कांदा उत्पादक देश आहे आणि महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठे कांदा उत्पादक राज्य मानले जाते. नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर, जळगाव यांसारख्या जिल्ह्यांतील लाखो शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था कांद्यावर अवलंबून आहे. त्यामुळे कांद्याच्या बाजारातील चढ-उतार हे केवळ कृषी क्षेत्रापुरते मर्यादित राहत नाहीत, तर त्याचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिणामही दूरगामी स्वरूपाचे असतात.

इतिहास साक्षी आहे की, कांद्याच्या दरांनी अनेकदा सरकारांची डोकेदुखी वाढवली आहे. काही दशकांपूर्वी दिल्लीतील एका सरकारच्या पराभवामागे कांद्याच्या वाढलेल्या किमती हे एक महत्त्वाचे कारण मानले गेले होते. त्यामुळे कांद्याचा विषय हा केवळ कृषी उत्पादनाचा प्रश्न नसून जनमानसाशी आणि राजकारणाशी जोडलेला विषय बनला आहे. तरीही दरवर्षी याच समस्यांची पुनरावृत्ती होत असल्याचे चित्र दिसते.

कांदा हा शेतकऱ्यांसाठी नगदी पीक आहे, तर ग्राहकांसाठी दैनंदिन आहाराचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे सरकारसमोर दोन परस्परविरोधी जबाबदाऱ्या उभ्या राहतात. एकीकडे ग्राहकांना स्वस्त दरात कांदा उपलब्ध करून द्यायचा असतो, तर दुसरीकडे उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळवून द्यायचा असतो. या दोन्ही टोकांच्या कात्रीत कांदा उत्पादक शेतकरी कायम भरडला जातो.

कधी कांद्याचे दर १५० ते २०० रुपये किलोपर्यंत पोहोचतात, तर कधी ते दहा रुपयांच्या खाली घसरतात. दर वाढले की ग्राहक त्रस्त होतात आणि सरकारवर दबाव येतो. दर घसरले की शेतकरी उद्ध्वस्त होतो. अशा परिस्थितीत दीर्घकालीन धोरणाऐवजी तात्पुरत्या उपाययोजना केल्या जातात. निर्यातबंदी, निर्यात शुल्क, आयात परवानग्या, बाजार हस्तक्षेप अशा उपायांचा अवलंब केला जातो; मात्र त्याचा फारसा शाश्वत परिणाम दिसून येत नाही. सरकारकडून हमीभाव जाहीर केला जातो, परंतु प्रत्यक्षात त्या भावाने खरेदीची प्रक्रिया वेळेत सुरू होत नाही. बाजार समित्यांमध्ये माल आणल्यानंतर शेतकऱ्याला दिवसेंदिवस प्रतीक्षा करणे परवडणारे नसते. कारण त्याच्याकडे साठवणुकीची सुविधा नसते, कर्जाचा भार असतो आणि पुढील शेतीकामांसाठी पैशांची गरज असते. परिणामी, तो मध्यस्थ आणि दलालांच्या दयेवर अवलंबून राहतो. अनेकदा उत्पादन खर्चापेक्षाही कमी दरात कांदा विकण्याची वेळ त्याच्यावर येते. मुळात कांदा उत्पादकांच्या समस्येचा केंद्रबिंदू म्हणजे साठवणूक व्यवस्थेचा अभाव. शेतकऱ्यांकडे आधुनिक गोदामे आणि शीतगृहांची सुविधा नसल्याने त्यांना काढणी झाल्यानंतर लगेच माल विकावा लागतो. जर साठवणूक क्षमता वाढवली गेली, तर बाजारातील तात्पुरत्या दरघटीपासून शेतकऱ्यांना संरक्षण मिळू शकते. परंतु या क्षेत्रात अपेक्षित गुंतवणूक आणि धोरणात्मक प्रयत्न अद्यापही अपुरे आहेत.

याशिवाय कृषी अर्थशास्त्राचा एक मूलभूत नियम दरवर्षी कांद्याच्या बाबतीत लागू पडतो. एखाद्या वर्षी कांद्याला चांगला भाव मिळाला की पुढील हंगामात मोठ्या प्रमाणावर शेतकरी कांद्याची लागवड करतात. परिणामी उत्पादन वाढते आणि पुरवठा मागणीपेक्षा जास्त होतो. त्यामुळे दर कोसळतात. हा दुष्टचक्र अनेक वर्षांपासून सुरू आहे. याचे अचूक नियोजन, पीक पद्धतीचे मार्गदर्शन आणि बाजाराभिमुख उत्पादन यंत्रणा विकसित करण्याची आवश्यकता आहे.

शेतकऱ्यांना केवळ अनुदान किंवा कर्जमाफी नव्हे, तर त्यांच्या उत्पादनाला हमखास लाभदायक किंमत मिळेल अशी यंत्रणा उभी करणे अधिक महत्त्वाचे आहे. उत्पादन खर्च, जोखीम, वाहतूक, साठवणूक आणि शेतकऱ्याचा योग्य नफा यांचा विचार करून दर निश्चित होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रक्रिया उद्योग, निर्यात साखळी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि थेट बाजारपेठेची उपलब्धता यांनाही प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०14 मध्ये सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते. त्या घोषणेला आता बारा वर्षांचा कालावधी उलटत आला आहे. काही क्षेत्रांमध्ये सुधारणा झाल्या असल्या तरी मोठ्या प्रमाणावर शेतकरी अजूनही आर्थिक अस्थिरतेला सामोरे जात आहेत. कांदा उत्पादकांची परिस्थिती त्याचेच उदाहरण आहे. आज गरज आहे ती कांद्याच्या प्रश्नाकडे केवळ दरवाढ किंवा दरघट या मर्यादित चौकटीतून न पाहता व्यापक कृषी सुधारणांच्या दृष्टीने पाहण्याची. साठवणूक क्षमता, निर्यात धोरणातील सातत्य, बाजारपेठेतील पारदर्शकता, प्रक्रिया उद्योगांचा विस्तार आणि शेतकऱ्यांना थेट लाभ देणारी किंमत यंत्रणा यांवर भर दिल्यासच कांदा उत्पादकांच्या डोळ्यांतील अश्रू थांबू शकतील.

अन्यथा दरवर्षी कांद्यावर चर्चा होईल, आंदोलने होतील, घोषणा होतील; पण शेवटी रडणारा शेतकरी आणि त्याच्या घामाचे मोल न मिळणारी शेती अशीच परिस्थिती कायम राहील. जगाला कांदा पुरवणाऱ्या देशातील कांदा उत्पादक शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि सन्मानाने जगू शकतील, अशी व्यवस्था निर्माण करणे हीच खरी काळाची गरज आहे.

# परळीत एलसीबीचा छापा; २६ किलो गांजासह पावणे आठ लाखांचा मुद्देमाल जप्त

**परळी । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने () परळीत अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर मोठी कारवाई केली आहे. परळी येथील रामनगर भागात एका घरावर छापा टाकून पोलिसांनी तब्बल २६ किलो २५८ ग्रॅम गांजा जप्त केला असून, एकूण ७ लाख ८७ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने



मंगळवार, दिनांक २ जून २०२६ रोजी दुपारी ४:३० वाजण्याच्या सुमारास परळीतील रामनगर भागातील एका घरावर छापा टाकला. या छाप्यात राहुल राजू मोहिते (वय २६ वर्षे, रा. रामनगर, परळी, जि. बीड) याच्या घरातून २६ किलो २५८ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला.

याप्रकरणी आरोपी राहुल मोहिते याच्याविरुद्ध परळी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४१/२००२६, कलम ८(क), २०(ब), () एन.डी.पी.ए अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आता या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार आणि गांजाचा पुरवठा कोठून होत होता, याचा तपास करत आहेत.

ही धडक कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वाखाली खालील पथकाने केली: पो.नि. रघुनाथ नाचन, पो.उ.नि. दीपक राठोडए.एस.आय. बालाजी दराडे पो.हे.कॉ. रामचंद्र केकान, गोविंद भताने, प्रल्हाद भताने, पुरुषोत्तम काळे, शितल घुगे पो.कॉ. सचिन आंधळे, पंडित पांचाळ, कैलास कोलमवाड, शुभम घुले आणि म.पो.कॉ. भोसले.या मोठ्या कारवाईमुळे बीड जिल्ह्यातील अंमली पदार्थ तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

# आगामी पावसाच्या सुरुवातीला बीड शहरातील सर्व ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवा-ॲड.गोविंद शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

येणाऱ्या पुढील आठ ते दहा दिवसांपूर्वी बीड शहरातील मान्सून पूर्व नदी नाले साफसफाई मोहीम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात यावी, तसेच सध्या बीड शहरामध्ये होणारी पाणीटंचाई दूर करण्यात यावी काही ठिकाणी बिन शहरातील असलेली पाईपलाईन लिकेज असलेली पाईपलाईन दुरुस्त करण्यात यावी त्यामधून येणारे पाणी बऱ्याच ठिकाणी फुटलेल्या पाईपलाईन दुरुस्ती, तसेच विद्युत खांबावरील असलेल्या बंद लाईटी तसेच दुरुस्ती बाबत, तसेच कोणताही जातीभेद न करता कोणताही बेल्ट न बघता, मग ग्रीन बेल्ट असो, ऑरेंज बेल्ट, की ब्लू बेल्ट, हिंदू मुस्लिम बौद्ध सर्व बेल्ट मध्ये जातीपाती न पाहता, सर्व धार्मिक स्थळे, शाळा , व ज्ञान मंदिर या




ठिकाणी असलेले बीड शहरातील विकासात्मक सर्व कामे पूर्ण करावीत अशी मागणी बीड नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष मा मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद बीड मा श्री शैलेश जी फडसे साहेब नगरपरिषद बीड यांच्याशी सकारात्मक बीड शहरातील सर्व विकासाच्या बाबतीमध्ये चर्चा नगरसेवक एडवोकेट गोविंद नवनाथ शिराळे यांनी केली ॲड.गोविंद भैया शिराळे यांच्यासमवेत बीड शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून अधिकारी साहेब यांना आपल्या ज्या बीड शहरातील विकासाच्या बाबतीत ज्या मागण्या आहेत त्या मागण्या त्यांच्यासमोर मांडल्या होत्या याची दखल तात्काळ घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जी फडशे साहेब यांनी या महत्त्वाच्या विषयाची दखल घेऊन बलगुजर परिसरातील जिजाऊ नगर, तिरुपती नगर, शिवाजीनगर, स्वराज्य नगर, खोल वाट, शिराळे नगर, सावता नगर, धांडे नगर, राजमुद्रा नगर, सोमेश्वर नगर या सर्व परिसरात आज नगरपरिषद प्रशासनाने स्वच्छता मोहीम सुरू केली असून बीड नगरपरिषद कर्तव्यदक्ष चे मुख्य धिकारी शैलेश फडसे साहेब यांचे आभार व्यक्त केले यावेळी नगरसेवक एडवोकेट गोविंद शिराळे, व सहकारी नगरसेवक नंदकिशोर पिंगळे व समस्त भागातील नागरिक मोठ्या संख्येने दिसून आले.

# घनकचरा वर्गीकरण सक्तीचे; नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई -जिल्हाधिकारी मित्तल

**जालना । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अंतर्गत कचऱ्याचे स्रोतस्थानी वर्गीकरण करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना दंडात्मक कारवाईचे अधिकार प्रदान करण्यात आले असून, नागरिक, व्यावसायिक आस्थापना आणि मोठे कचरा उत्पादक यांनी नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. प्रशासनाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, प्रत्येक नागरिकाने आपल्या घरातून निर्माण होणारा कचरा चार स्वतंत्र प्रकारांत वर्गीकृत करून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे द्यावा. यामध्ये ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी कचरा आणि विशेष देखभाल/घातक कचरा यांचा समावेश आहे. कचरा मिसळून दिल्यास अथवा नियमांचे पालन न केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण केल्यास पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे सुलभ होते. यामुळे लँडफिलमध्ये जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी होऊन पर्यावरण संरक्षणास मदत होते. तसेच शहर आणि ग्रामीण भागातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक परिणामकारक बनते. घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार दररोज मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या संस्था, कार्यालये, शैक्षणिक संस्था, हॉटेल्स, रुग्णालये, बाजारपेठा, गृहसंकुले आणि इतर व्यावसायिक आस्थापनांना म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. अशा संस्थांनी त्यांच्या परिसरातच ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रक्रिया यंत्रणा उभारणे बंधनकारक आहे. नियमांनुसार दररोज १०० किलो किंवा त्यापेक्षा अधिक कचरा ज्यांचे क्षेत्र २० हजार स्के.मी आहे अथवा ४०,००० लिटरपेक्षा जास्त पाणी वापर करणाऱ्या संस्थांनी ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे



आवश्यक आहे. तसेच कचऱ्याचे वर्गीकरण करूनच स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सुपूर्द करणे अपेक्षित आहे. जे निर्देशांचे पालन करणार नाहीत त्यांचे पाणी / वीज पुरवठा थांबविण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व नागरिक, संस्था आणि व्यावसायिक आस्थापनांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ तसेच न्यायालयीन निर्देशांचे पालन करून स्वच्छ, निरोगी आणि प्रदूषणमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. ओला कचरा स्वयंपाकघरातील अवशेष (भाज्यांचे देठ, पाने, साल), शिळे अन्न, फळांच्या साली व बिया, गवत, बागेतील कचरा, फुले व पाने, चहा व कॉफीचा चोथा, पशुखाद्य अवशेष सुका कचरा : प्लास्टिक (बाटल्या, पिशव्या, खेळणी), कागद (वर्तमानपत्र, पुस्तके, पुठ्ठा), धातू (ॲल्युमिनियम, स्टील, लोखंड), काच (बाटल्या, तावदाने), लाकडी वस्तू (फर्निचर, बांबू), कापड व चामडे, जुने कपडे, शूज व इतर वस्तू सॅनिटरी कचरा : सॅनिटरी पॅड, डायपर, फेस मास्क, बँडेज, सॅनिटरी वापरातील वस्तू , संसर्गजन्य पदार्थांचे अवशेष, विशेष देखभाल / घातक कचरा : बॅटऱ्या (मोबाईल, रिचार्जेबल), ट्यूबलाईट व बल्ब, पेंट, थिनर व रासायनिक पदार्थ, कीटकनाशके व त्यांचे अवशेष, ई-कचरा (जुने फोन, संगणक भाग), सॅनिटायझर व इतर धोकादायक पदार्थ घनकचरा व्यवस्थापन नियमांची अंमलबजावणी अधिक कडक होणार असून, प्रत्येक नागरिकाने घरातूनच कचऱ्याचे वर्गीकरण करण्याची सवय लावणे काळाची गरज असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पगारासाठी लाभार्थ्यांनी सत्यापन ॲप'द्वारे हयात प्रमाणपत्र करून घ्यावे-प्रणाली तायडे

**जालना । प्रतिनिधी**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत विशेष सहाय्य योजनांतील लाभार्थ्यांना आता 'बेनेफिशियरी सत्यापन ॲप ()'च्या माध्यमातून डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशी माहिती संजय गांधी विभागाचे तहसीलदार प्रणाली तायडे यांनी दिली आहे.**

शासन निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनांतील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आदी योजनाद्वारे वृध्द, विधवा, निराधार महिला-पुरुष, दिव्यांग व इतर गरजु लाभार्थ्यांना दरवर्षी हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. संबंधित आर्थिक वर्षात लाभार्थ्यांनी प्रमाणपत्र सादर केल्यास बंद करण्यात आलेले अर्थसहाय्य पुन्हा सुरू करण्याची तरतूद शासनाने केली आहे. असे आव्हान तहसीलदार प्रणाली तायडे यांनी केले आहे. केंद्र पुरस्कृत योजनांतील लाभार्थ्यांना मोबाईल ॲपच्या माध्यमातून हयात प्रमाणपत्र सादर करता यावे यासाठी ' ' ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. याच धर्तीवर राज्य पुरस्कृत योजनांतील लाभार्थ्यांनाही ऑफलाईन प्रक्रियेऐवजी प्रणालीद्वारे ऑनलाईन हयात प्रमाणपत्र सादर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे वृद्ध, विधवा तसेच दुर्धर आजाराने ग्रस्त लाभार्थ्यांना बँक, पोस्ट कार्यालय किंवा तहसील कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची आवश्यकता राहणार नाही. लाभार्थी स्वतः मोबाईलद्वारे, नातेवाईकांच्या मदतीने किंवा गावपातळीवरील ग्राम महसूल कर्मचारी, ग्रामपंचायत संगणक परिचालक, सेतू सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र आदींच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने हयात प्रमाणपत्र सादर करू शकतात. ही सेवा लाभार्थ्यांसाठी निशुल्क असून, सेतू सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्रामार्फत सेवा घेतल्यास किमान ५० रुपये सेवा शुल्क देय राहील. लाभार्थ्यांनी स्वतः अथवा कुटुंबीयांच्या मदतीने प्रणालीचा वापर करून हयात प्रमाणपत्र प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन तहसिलदार (संगायो) प्रणाली तायडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## पान १ वरून...

### महाराष्ट्रात ऐतिहासिक

मुक्तता मिळवून देणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. दरम्यान, शेतकरी कर्जमाफीच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची स्थापना केली होती. शेतकऱ्यांना थकीत कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी तसेच त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांचा अभ्यास करून समितीने शासनाला सविस्तर अहवाल सादर केला होता. त्या अहवालातील शिफारशींचा विचार करून सरकारने हा निर्णय घेतल्याचे समजते. राज्यात गेल्या काही वर्षांपासून अवकाळी पाऊस, दुष्काळसदृश परिस्थिती, उत्पादन खर्चात झालेली वाढ आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत कर्जमाफीचा निर्णय शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा ठरणार असल्याची प्रतिक्रिया विविध शेतकरी संघटनांनी व्यक्त केली आहे. आचारसंहिता संपल्यानंतर शासनाकडून योजनेचे निकष, पात्रता, अर्ज प्रक्रिया आणि अंमलबजावणीबाबतची सविस्तर माहिती जाहीर केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांचे लक्ष आता या योजनेच्या अधिकृत घोषणेकडे लागले आहे.

---------------

### महाराष्ट्रच्या दोन बसचा गुजरातमध्ये

पलटी झाली आणि काही क्षणांतच बसला भीषण आग लागली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, बस पलटल्यानंतर मोठा स्फोटासारखा आवाज झाला आणि आग झपाट्याने संपूर्ण बसमध्ये पसरली. त्यामुळे काही प्रवाशांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. आगीत अडकलेल्या सात जणांचा जागीच मृत्यू झाला असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक अग्निशमन दल, पोलीस आणि रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. जखमी प्रवाशांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. या दुर्घटनेमुळे धुळे-सुरत महामार्गावर दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

--------------

### पेट्रोल-डिझेल आणखी

वस्तूंच्या किंमतींवर दिसून येतो. क्रिसिलच्या अंदाजानुसार, इंधनाच्या दरात ७.५ रुपयांची वाढ झाल्यास किरकोळ महागाई दरात सुमारे ०.३६ टक्क्यांची वाढ होऊ शकते. जर दरवाढ १० रुपयांपर्यंत पोहोचली, तर महागाईत जवळपास ०.४८ टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. वाहतूक खर्च वाढल्यामुळे दूध, फळे, भाज्या, डाळी, चहा, कॉफी, मसाले, अंडी, मांस आणि मासे यांसारख्या रोजच्या वापरातील वस्तू महाग होऊ शकतात. या वस्तूंचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर वाहतूक नेटवर्कवर अवलंबून असतो. याशिवाय कपडे, ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स, लाकडी उत्पादने, सिमेंट, सिरेमिक आणि बांधकाम क्षेत्रातील उत्पादनांच्या किंमतींमध्येही वाढ होण्याची शक्यता आहे. रसायन, कोळसा आणि धातू उद्योगांवरही इंधन दरवाढीचा परिणाम होऊ शकतो. उत्पादन खर्च वाढल्यास कंपन्या हा अतिरिक्त भार ग्राहकांवर टाकू शकतात. काही कंपन्या उत्पादनाचे प्रमाण कमी करूनही खर्च नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करू शकतात. अहवालानुसार, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत कच्च्या तेलाची सरासरी किंमत ११२ डॉलर प्रति बॅरल राहिली आहे. ही किंमत संपूर्ण वर्षासाठी गृहीत धरलेल्या ९५ डॉलर प्रति बॅरल या अंदाजापेक्षा खूप जास्त आहे. यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींवर आणखी दबाव येण्याची शक्यता आहे.

**एल निनोचा प्रभाव दिसणार**

सध्या देशातील एकूण महागाई दर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ४ टक्के लक्ष्याच्या खाली आहे. मात्र आगामी काळात त्यात वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय कमकुवत मान्सून, एल निनोचा प्रभाव आणि कृषी उत्पादनातील घट यामुळे अन्नधान्य महागाई वाढू शकते. त्यामुळे रिझर्व्ह बँकही महागाईच्या स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

**सर्वसान्यांना सर्वाधीक फटका**

पेट्रोल-डिझेलचे दर वाढल्यास त्याचा परिणाम केवळ वाहनधारकांपुरता मर्यादित राहत नाही. वाहतूक, उत्पादन आणि वितरण खर्च वाढल्यामुळे जवळपास प्रत्येक वस्तूच्या किंमतीवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे येत्या काही महिन्यांत महागाईचा दबाव वाढण्याची शक्यता असून सामान्य नागरिकांच्या घरगुती बजेटवर त्याचा परिणाम दिसू शकतो.

--------------

### सोलापुरमध्ये काँग्रेस उमेदवाराचा

काँग्रेसकडून सूचक म्हणून अर्ज केलेल्या व्यक्तीनेच घेतलेल्या हरकतीमुळे पक्षाच्या उमेदवारावर ही नामुष्की ओढावली आहे. यामुळे भाजपचे उमेदवार राजेंद्र राऊत यांचा विजयाचा मार्ग आता सुकर झाला आहे. मित्र समजून ज्याच्या खांद्यावर डोकं ठेवलं त्याने केसाने गळा कापला, अशी प्रतिक्रिया देताना काँग्रेस उमेदवार आदित्य फत्तेपूरकर भावूक झाल्याचं दिसून आलं. काँग्रेसच्या उमेदवाराचा अर्ज बाद झाल्यानंतर भाजपचे राजेंद्र राऊत, शरद पवार राष्ट्रवादीकडून वसंत देशमुख, नागेश अक्कलकोटे, जीवन जानकर, धनंजय डिकोळे, महेश साठे, रमेश बारसकर यांचा अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज वैध ठरवण्यात आला आहे. सोलापूर विधानपरिषदेसाठी एकूण ७ उमेदवारांचे अर्ज वैध ठरलेत. काँग्रेसचे उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांचा अर्ज बाद होण्यामागे एक नाट्यमय घडामोड कारणीभूत ठरली. फत्तेपूरकर यांच्या उमेदवारी अर्जावर सूचक म्हणून नागेश भोसले यांचे नाव आणि स्वाक्षरी होती. मात्र, छाननीच्या वेळी नागेश भोसले यांनी अचानक निवडणूक अधिकाऱ्यांकडे धाव घेत, 'या अर्जावरील सही माझी नाही' असा खळबळजनक आक्षेप घेतला या गंभीर हरकतीनंतर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सूचक नागेश भोसले आणि उमेदवार आदित्य फत्तेपूरकर या दोघांचीही बाजू सविस्तरपणे ऐकून घेतली आणि आपला निर्णय काही काळासाठी राखून ठेवला होता. मात्र, अखेर सूचक नागेश भोसले यांची हरकत आणि पुरावे ग्राह्य धरत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी काँग्रेस उमेदवाराचा अर्ज अधिकृतपणे बाद केला.

----------------

### आणखी ६० लाख लाडक्या

मंत्री अदिती तटकरे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. सरकार विविध अटी आणि केवायसीच्या निकषांद्वारे लाभार्थ्यांची संख्या कमी करत असल्याचा आरोप त्यांनी केला. यामुळे पुढील काही महिन्यांत ही योजना केवळ नावापुरती उरेल, असा दावा त्यांनी केला. दानवे यांनी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील तणावावरही भाष्य केले. अब्दुल सत्तर यांनी व्यक्त केलेल्या नाराजीचा संदर्भ देत त्यांनी भाजप मित्रपक्षांना कमकुवत करण्याचे काम करत असल्याचा आरोप केला. तसेच भाजपने पूर्वी अनेक राज्यांमध्ये सहयोगी पक्षांचे राजकीय अस्तित्व कमी केल्याचा दावाही त्यांनी केला. दरम्यान, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शिंदे गटातील नाराज नेत्यांनी पुनर्विचार करून परत यावे, असे केलेल्या आवाहनालाही दानवे यांनी समर्थन दिले आहे. लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी पडताळणी, केवायसी प्रक्रिया आणि अपात्र लाभार्थ्यांचा प्रश्न यावरून आगामी काळात राज्यातील राजकारण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

----------------

### कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय

देवदत्त निकम यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, वाढती महागाई, शेती उत्पादनाचा वाढलेला खर्च आणि शेतमालाला मिळत नसलेला योग्य भाव यामुळे राज्यातील शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. विशेषतः कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या अडचणीत असून बाजारात कांद्याचे दर घसरल्याने त्यांना उत्पादन खर्चही वसूल होत नाही. सरकारने कांद्याच्या शासकीय खरेदीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात अद्याप खरेदी प्रक्रिया सुरू झालेली नाही. कांद्याची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फतच करण्यात यावी, अशी आमची स्पष्ट मागणी आहे. खरेदी प्रक्रियेत व्यापाऱ्यांचा फायदा करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे आणि त्यांना योग्य हमीभाव मिळाला पाहिजे. शेतकरी संकटात असताना सरकारकडून अपेक्षित मदत मिळत नसल्याने ग्रामीण भागात मोठी नाराजी आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष आणि संपूर्ण महाविकास आघाडी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य हमीभाव आणि दिलासा मिळेपर्यंत काँग्रेसचा संघर्ष सुरू राहील, असा इशाराही यावेळी दिला.

-------------

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १३०१/२०२६**

**महादेव राजेंद्र जुळे -विरुध्द ग्रा.पं. कार्या भंडारवाडी**

पहा

१. महादेव राजेंद्र जुळे, रा. भंडारवाडी ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक महादेव राजेंद्र जुळे यांचा दिनांक ३०/०७/१९९७ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत भंडारवाडी कार्यालय/न.प. कार्यालयास भंडारवाडी ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे भंडारवाडी ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/६/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०१/०७/२०२६ ही आहे.

**स्वाक्षरीत/-**
**तहसिलदार, बीड**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. ०३ जून २०२६
३

## थोडक्यात

### मोफत आरोग्य तपासणी सप्ताहाचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर च्या वतीने पाटोदा तालुक्यात दि. ४ जून ते ११ जून दरम्यान मोफत आरोग्य तपासणी, नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबीर (आरोग्य सप्ताह) आयोजित करण्यात आला आहे.

**श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या सद्गुरू प पू मोरेदादा हॉस्पिटल चा उपक्रम**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशिर्वादाने व युवासंत चंद्रकांत (दादासाहेब) मोरे यांच्या आदेशानुसार पाटोदा तालुक्यात दि. ४ ते ११ जून दरम्यान मोफत आरोग्य तपासणी, नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबीर सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या शिबीरात वात, कफ, पित्त, कान, नाक, घसा, सांधेदुखी, डोकेदुखी, अर्धांगवायू, त्वचारोग, पोटदुखी, महिलांचे आजार तसेच सर्व आजारांची मोफत तपासणी करण्यात येणार आहे, दि. ४ जून रोजी ईट, ५ जून रोजी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र क्रांती नगर पाटोदा, , ६ जून रोजी दिघोळ, ७ जून रोजी अंमळनेर, ८ जून रोजी घुमरा पारगाव, ९ जून रोजी धनगर जवळका, १० जून रोजी पारनेर, तसेच ११ जून रोजी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रस्ता गल्ली पाटोदा येथे शिबीर संपन्न होणार आहे. या शिबीरात तज्ञ डॉक्टर लाभणार आहे. तरी संबंधित ठिकाणी जास्तीत जास्त नागरिकांनी, रुग्णांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी पाटोदा तालुका यांनी केले आहे.

### इरफान कुरेशी शिवसेना अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाप्रमुख

बीड । प्रतिनिधी

जिल्हा शिवसेना अल्पसंख्याक आघाडी जिल्हा प्रमुख पदी तरुण तडफदार चेहरा बीड शहरातील मोठा युवकांचा ग्रुप असलेले इरफान सेट कुरेशी यांची यांची निवड करण्यात आली, गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक व राजकीय जीवनात कोणत्याही पदासाठी मेहनत न करता सर्वसामान्यांच्या अडचणी समस्यासाठी अहोरात्र झगडणारा युवा तरुण तडफदार चेहरा म्हणून इरफान कुरेशी यांच्याकडे पाहिले जाते कुरेशी युवा मंच जिल्हाध्यक्ष च्या माध्यमातून जिल्हाभरात युवकांचा संघटन मजबूत करण्याचं त्यांनी काम केलेलं आहे इरफान कुरेशी समाजसेवक जावेद भैय्या कुरेशी यांचे भाचे आहे त्यांच्या या निवडीबद्दल मराठवाड्यातील मित्रपरिवार व कुरेशी समाजातर्फे अभिनंदनचा वर्षाव होत आहे, ही निवड शिवसेना अल्पसंख्याक आघाडी प्रदेश कार्याध्यक्ष समीर काजी साहेब यांनी निवड केली यांच्या निवडीबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले समाजसेवक जावेद भैय्या कुरेशी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.



## सम्राट अशोक नगरच्या नागरिकांची भर उन्हात पाण्यासाठी लाही लाही ; नगरसेवक घरात बसून नुसतेच पाही !

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील सम्राट अशोक नगर परिसरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांना भर उन्हात पाण्यासाठी अक्षरशः लाही लाही होत आहे. एकीकडे तापमानाचा पारा चढलेला असताना दुसरीकडे अपुरा व अनियमित पाणीपुरवठा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न बनला आहे. मात्र या गंभीर समस्येकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे.





परिसरातील अनेक घरांमध्ये नळाला अत्यल्प दाबाने पाणी येत असल्याने नागरिकांना पुरेसे पाणी साठवता येत नाही. महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि लहान मुलांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. प्रसंगी अनेक नागरिकांनी आपल्या अडचणी नगरसेवकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला, फोनद्वारे संपर्क साधून उपाययोजना करण्याची विनंती केली. मात्र समस्येची दखल घेण्याऐवजी नगरसेवकांनी परिसराकडे फिरकलेही नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

निवडणुकीच्या काळात मतांसाठी घराघरात येणारे लोकप्रतिनिधी आता नागरिकांच्या पाण्याच्या प्रश्नावर कुठे आहेत ? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. भर उन्हात पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी संघर्ष करावा लागत असल्याने नागरिकांचा रोष दिवसेंदिवस वाढत आहे.

सम्राट अशोक नगरमधील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करून पाणी उपलब्ध करून द्यावे व कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही या वेळी देण्यात आला आहे.

नागरिक पाण्यासाठी त्रस्त, पण जबाबदार मात्र मस्त,

पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. त्यासाठी नागरिकांना भर उन्हात आक्रोश करावा लागत असेल, तर ही केवळ पाणीटंचाई नसून व्यवस्थेच्या अपयशाची जिवंत साक्ष आहे,

अशी उपरोधिक प्रतिक्रिया परिसरातील नागरीकांतून व्यक्त होत असून प्रशासन व लोकप्रतिनिधी आता तरी जागे होणार का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## एमआयडीसीतील गोदामाला भीषण आग

### सरकी-पेंड जळून खाक,६ तासानंतर आग आटोक्यात

बीड । प्रतिनिधी

शहरातील एमआयडीसी परिसरात सोमवारी पहाटे लागलेल्या भीषण आगीत सरकी आणि पेंडचा मोठा साठा जळून खाक झाला. आगीची तीव्रता इतकी होती की, अग्निशमन दलाला तब्बल सहा तास शर्थीचे प्रयत्न करावे लागले. दुपारी सुमारे बारा वाजण्याच्या सुमारास आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात यश आले. या घटनेत लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एमआयडीसी परिसरातील आकाशवाणी केंद्रामागे असलेल्या सुभाष सारडा यांच्या मालकीच्या गोदामात सोमवारी सकाळी सुमारे सहा वाजण्याच्या दरम्यान अचानक आग लागली. गोदामात मोठ्या प्रमाणावर सरकी, पेंड आणि अन्य ज्वलनशील साहित्याचा साठा असल्याने आगीने काही क्षणांतच उग्र रूप धारण केले.

आगीतून निघणारे धुराचे प्रचंड लोट दूरवरून दिसत असल्याने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे बंब, पाण्याचे टँकर आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

**आग विझवण्यासाठी जेसीबीची मदत**

गोदामात मोठ्या प्रमाणावर साठवण्यात आलेल्या ज्वलनशील साहित्यामुळे आग नियंत्रणात आणणे अग्निशमन दलासाठी मोठे आव्हान ठरले. सतत पाण्याचा मारा करूनही ज्वाला पुन्हा-पुन्हा भडकत असल्याने गोदामातील साहित्य जेसीबीच्या सहाय्याने बाहेर काढून आग विझवण्याचे प्रयत्न करण्यात आले.

सुमारे सहा तास सुरू असलेल्या बचाव आणि अग्निशमन मोहिमेनंतर अखेर दुपारी बारा वाजता आग आटोक्यात आणण्यात यश आले.

**मोठे आर्थिक नुकसान**

या भीषण आगीत गोदामातील सरकी, पेंड, ताडपत्री तसेच शेडवरील पत्रे पूर्णपणे जळून खाक झाली. आगीच्या तीव्रतेमुळे गोदामाच्या काही भिंतीही कोसळल्या. महसूल विभाग आणि संबंधित यंत्रणेकडून पंचनामा सुरू असून, नुकसानीचा नेमका आकडा अद्याप समोर आलेला नाही. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, याबाबत तपास चालू आहे.

पान ६ वरुन...

### कोणतीही परवानगी न घेता

आढळून आली आहे यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचेही समोर आले आले असून सदरील अहवाल वरिष्ठांकडे पाठवण्यात आला असून त्या अहवालाची एक प्रत उपोषणकर्त्या सौ जयश्री मधुसूदन केंद्रे यांनाही देण्यात आली असून वरिष्ठ स्तरावरून आदेश प्राप्त होताच बेकायदेशीर होत असलेले अतिक्रमण लवकरच काढले जाईल असे आश्वासन यावेळी देण्यात आले उपोषणकर्त्या सौ जयश्री मधुसूदन केंद्रे यांना अहवालाची प्रत देताना व आश्वासन देताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे सातपुते,राठोड,जाधव,मठपती,दुधगावकर,माने,राऊत मॅडम आदींची उपस्थिती होती. कधीही सत्याचा विजय असतो असा विश्वास उपोषण करत्या सौ जयश्री मधुसूदन केंद्रे यांनी व्यक्त करून आपले उपोषण तात्पुरते थांबवले.

### 'मेरी बात' कार्यक्रमात

शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. शिक्षण क्षेत्रातील अनुभवांमधून त्यांनी कथा लेखनास सुरुवात केली. पुढे कथासंग्रह, कवी संमेलनांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. याशिवाय वृक्षारोपण, साक्षरता अभियान आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आंतरभारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष अमर हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा आंतरभारती व मराठवाडा साहित्य परिषदेसोबतचा प्रवास अधिक समृद्ध झाला. साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या सहवासातून मिळालेले अनुभव त्यांनी यावेळी उपस्थितांसोबत शेअर केले.कार्यक्रमास साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी गोरख शेंद्रे यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन व्यंकटेश जोशी यांनी केले.

### लोकनेता गोपीनाथराव

एकानंतर एक पदांवर काम करतांना १९९२ ते १९९५ काळात गोपीनाथरावांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत विरोधीपक्षनेता म्हणून काम केले. खऱ्या अर्थाने इथेच मुंडे साहेबांची ओळख महाराष्ट्राच्या तमाम जनतेला झाली. थोड्याच काळात गोपीनाथराव हे भाजप आणि उपेक्षितांचा चेहरा बनले. या सगळ्या गोष्टी जुळून आणण्यासाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले, रात्रंदिवस प्रवास, गावोगाव-खेड्यापाड्यातील सामान्य माणसांच्या भेटीगाठी घेऊन जनसामान्य लोकांमध्ये आत्मविश्वास जागृत केला. लाखोंच्या सभा जिंकण्याचे कसब, खडा आवाज, भारदस्त व्यक्तिमत्व, ग्रामीण आणि शहरी लोकांची नाडी पकडून-लोकांचा प्रतिसाद घेऊन बोलण्याची संभाषण कलेच्या देणगीने गोपीनाथरावांनी संपूर्ण महाराष्ट्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. एक दशकांच्या कामात मुंडे साहेब महाराष्ट्रातील ओबीसी आणि वंचित-शोषितांचा चेहरा झाले. त्यांनी १९९४ साली संघर्ष यात्रा काढून राजकारणातील गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, जळगावचे सेक्स स्कँडल यातून मुंडे साहेबांनी महाराष्ट्रभर रान उठवले. तत्कालीन सरकारवर विधानसभेत आणि विधानसभेबाहेर घणाघाती हल्ले करून सरकारमधील मंत्र्यांना नामोहरम केले. महाराष्ट्राच्या राजकारणात मुंडे नावाचे नवे वादळ घोंगावत होते आणि त्या वादळात भल्याभल्यांचे राजकीय मनसुबे धुळीस मिळाले! याचा कळस म्हणजे मुंडे साहेब दोनवेळा बीड मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. लोकनेते गोपीनाथराव आणि महाराष्ट्राच्या सुदैवाने केंद्रात भाजपचे बहुमत आले आणि श्री नरेंद्र मोदींच्या पहिल्या मंत्रिमंडळात गोपीनाथरावांना केंद्रीय ग्रामविकासमंत्री-कॅबिनेट मंत्रिपद झाले! दुर्दैवाने हा आनंद जास्त काळ टिकू शकला नाही आणि ३ जून रोजी मुंडे साहेबांचे अपघाती निधन झाले! महाराष्ट्राच्या राजकारणात फार मोठी पोकळी निर्माण झाली. राजकारणाच्या आणि जात-धर्म या पलीकडे आपली ओळख निर्माण करणारा असा लोकनेता पुन्हा होणे नाही. विद्यमान काळात राजकारणाने कूस बदलली असून अनेक नवनवीन समीकरणे समोर येतांना मतदार गोंधळून गेला आहे. आज सर्व महाराष्ट्राचे भले करणारे, जातीय तेढ कमी करून सामाजिक सौहार्द रुजवणारे सर्वसमावेशक मुंडे साहेबांसारखे नवे नेतृत्व उभे राहणे गरजेचे आहे. राजकारणातील कट्टरतेचे निर्मुलन करून लोकांची कामे करणाऱ्या लोकनेत्याची नितांत गरज आज महाराष्ट्राला आहे. आजही सामान्य आणि सर्वच लोक आज गोपीनाथराव मुंडे साहेब असते तर असे झाले नसते! असे भावनिक उद्गार काढतांना ऐकूण मन व्यथित होते! चला पुन्हा एखादे सामान्यांतून असामान्य गोपीनाथराव मुंडे उदयास येतील आणि निस्वार्थ भावनेने लोकांचे प्रश्न मांडतील का? या प्रश्नासह अशी अशा करूया!

### बीड शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता

मंजूर विकासकामे तातडीने सुरू करणे, भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या समस्येवर उपाययोजना करणे, सहकार भवनाच्या बाजूने नाली करणे, तहसील भागातील कॉलनीचे पाणी काढणे, स्ट्रीट लाईट उपलब्ध करून बसविणे, कुत्रे निर्बीजीकरण सुरू ठेवावे, एमजीपीने केलेल्या क्रॉसिंग पंधराव्या वित्त आयोगातून दुरुस्त करून अमृत योजना १.० दुरुस्त करून घ्यावी, अग्निशामक गाड्या खरेदी कराव्यात, तसेच शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेतील अडचणी दूर करण्याबाबत चर्चा करण्यात आली. याशिवाय, काही व्यक्तींनी नगर परिषदेत अनधिकृतपणे विविध विभागांमध्ये आपल्या माणसांची नियुक्ती केल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. अशा प्रकारांमुळे आर्थिक देवाणघेवाण होऊन कामे केली जात असल्याची नागरिकांमध्ये भावना निर्माण होत असल्याने या प्रकारांवर तात्काळ निर्बंध आणून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली. नगरपालिकेच्या कामकाजात अशा प्रकारच्या अनधिकृत हस्तक्षेपाला आळा घालणे आवश्यक असून भविष्यात अशा प्रकारांना वाव मिळू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीस नगरसेवकांसह पालिकेच्या विद्युत, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी उपस्थित होते. शहरातील मूलभूत सुविधांबाबत नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडविण्यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

**आचारसंहितेची प्रतीक्षा न करता रस्ते, नाल्यांची कामे तत्काळ सुरू करावीत**

शहरातील विकासकामांचाही आढावा घेण्यात आला. सुमारे २२ कोटी रुपयांच्या विकासकामांची वर्क ऑर्डर प्रक्रिया पूर्ण झालेली असून, आगामी निवडणूक आचारसंहितेची प्रतीक्षा न करता रस्ते व नाल्यांची कामे तत्काळ सुरू करावीत, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली. पावसाळ्यापूर्वी ही कामे पूर्ण झाल्यास नागरिकांच्या गैरसोयी कमी होऊन शहरातील वाहतूक व पाणी निचऱ्याच्या समस्यांवर काही प्रमाणात दिलासा मिळेल, असे त्यांनी सांगितले.

## माजलगावचे पोलीस अंमलदार विलास इचके यांची फुल मॅरेथॉनमध्ये यशस्वी घोडदौड!

माजलगाव । प्रतिनिधी

येथील माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात मागील चार वर्षांपासून कार्यरत असलेले पोलीस अंमलदार विलास प्रल्हाद इचके यांनी आपल्या कर्तव्यासोबतच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांनी ३१ मे २०२६ रोजी अहिल्यानगर (अहमदनगर) येथे संपन्न झालेल्या अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि आव्हानात्मक हिस्टोरिक रन - सीजन ५ या स्पर्धेत ४२ किलोमीटरची फुल मॅरेथॉन यशस्वीरीत्या पूर्ण करून पोलीस दलाचा नावलौकिक वाढवला आहे.



पोलीस दलातील अत्यंत व्यस्त आणि जबाबदारीच्या दिनचर्येतून वेळ काढत, केवळ धावण्याच्या (रनिंग) आवडीपोटी विलास इचके यांनी या कठीण स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यांनी ४२ किलोमीटरचे हे अंतर अवघ्या ०४ तास ४८ मिनिटे आणि ०९ सेकंदांत पूर्ण करून फिनिशर सर्टिफिकेट पटकावले. या स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगर सायकलिंग क्लब आणि अहिल्यानगर ॲथलेटिक असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आले होते. वसुधैव कुटुम्बकम् या संकल्पनेवर आधारित या मॅरेथॉनला भारतीय सैन्य दल आणि फीट इंडिया यांचेही सहकार्य लाभले होते.

विलास इचके यांच्या या यशाबद्दल माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी पोलीस निरीक्षक देविदास गात, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवळे, सचिन शिंदे पोलीस उपनिरीक्षक, संदीप राठोड पोलीस उपनिरीक्षक, तसेच माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी. व अंमलदार स्टाफ, मित्रपरिवार आणि माजलगावच्या क्रीडाप्रेमींकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. खाकी वर्दीतील त्यांच्या या क्रीडा कौशल्यामुळे तरुणांना फिटनेस आणि आरोग्याविषयी एक मोठी प्रेरणा मिळाली आहे.

## मराठवाडा साहित्य परिषदेचा 'एक दिवस मराठीचा' कार्यक्रम संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने दि ०२ जुन सोमवार रोजी २९६ वा एक दिवस मराठीचा हा कार्यक्रम संपन्न झाला .यामध्ये कवी उत्तम आवचार यांनी 'मी आणि माझी कविता' या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मसापचे कार्यवाह किशोर गुंजकर होते.



यावेळी बोलताना कवी उत्तम आवचार म्हणाले की, मी शालेय जीवनापासून कविता लिहायला सुरुवात केली. माझ्या गावामध्ये जे वातावरण होतं, त्याचं मी बारकाईने निरीक्षण करू लागलो. हा सर्व निसर्ग मी माझ्या कवितेत मांडला. मी लिहिलेल्या कविता माझ्या शिक्षकांना दाखवत असे. त्यांनी मला कविता लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिले. यावेळी त्यांनी

संसार हा रंगमंच सर्व सदस्य हे नट सावली वटवृक्षाची आई वडिलांची दाट ही कविता सादर केली. त्यानंतर त्यांनी

माणसाच्या प्रवृत्तीला अवगुणाची फोडणी
समाजभान ठेवून जन्मजातच आळणी

ही कविता सादर केली.या व्यतिरिक्त त्यांनी प्रेमळ नातं ही कविता सादर केली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप किशोर गुंजकर यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालासाहेब झोडगे यांनी केले. सूत्रसंचालन शरद रांजवण यांनी केले तर आभार मोहन राठोड यांनी मानले. यावेळी भगवान धरपडे, खेलबा काळे, उमेश आगे, स्वानंद फपाळ यांच्यासह साहिप्रेमींची उपस्थिती होती.

## आदित्य महाविद्यालयात रुग्णांच्या प्रत्यक्ष सेवेची मूल्यमापन कार्यशाळा

### विद्यार्थ्यांच्या क्लिनिकल व व्यावसायिक कौशल्य विकासासाठी ६ तास विशेष प्रशिक्षण

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक ज्ञान वृद्धिंगत करण्यासोबतच त्यांच्यात उत्कृष्ट क्लीनिकल आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने मूलभूत तत्त्वांपासून ते थेट रुग्णांच्या प्रत्यक्ष सेवेपर्यंतचे मूल्यमापन या विषयावर एक दिवसीय विशेष कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.या भव्य कार्यशाळेत शेकडो विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होत थेट रुग्णसेवेचे आणि आधुनिक उपचार पद्धतींचे तांत्रिक धडे गिरवले.या महत्त्वपूर्ण कार्यशाळेचे उद्घाटन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते करण्यात आले.



आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत सलग सहा तास चाललेल्या या अभ्यासपूर्ण सत्राला प्रमुख वक्त्या व मार्गदर्शक म्हणून डॉ. सुमय्या झरीन शेख (झढ, झहऊ) उपस्थित होत्या. व्यासपीठावर संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, डॉ. सुमय्या झरीन शेख, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राध्यापक डॉ. धनश्री टाकसाळ यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात चांगल्या पदावर जाण्यासाठी प्रेरित करताना सांगितले की, स्वप्न पाहणे सोपे असते, पण ती पूर्ण करण्यासाठी अपार मेहनत आणि जिद्द असावी लागते.

महाविद्यालयाचे प्रा. बहिरवाळ यांनी मनोगतात स्पष्ट केले की,विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी अशा कार्यशाळा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. फिजिओथेरपी क्षेत्रात रोज नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत असल्याने विद्यार्थ्यांनी सतत नवीन गोष्टी शिकण्याची वृत्ती ठेवून संशोधन आणि प्रात्यक्षिकांमध्ये सक्रिय राहावे, ज्यामुळे व्यावसायिक जीवनात यश मिळेल. या प्रसंगी विद्यार्थ्यांनीही आपले अनुभव मांडले. चतुर्थ वर्षातील विद्यार्थी विशाल पवार याने महाविद्यालयातील आपला प्रवास सांगताना, संस्था व महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहते अशी कृतज्ञता व्यक्त केली. तर माधवी भगत हिने महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी प्राध्यापक घेत असलेल्या मेहनतीचे कौतुक केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन चतुर्थ वर्षाची विद्यार्थिनी माधवी भगत हिने केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. श्वेतजा चोपडे, डॉ. धनश्री टाकसाळ, डॉ. संदेश दळवी, डॉ. रजनी शिंदे, प्रा. राठोड आरती, प्रा. गौड ब्रम्हणी यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रथम ते चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### फिजिओथेरपी हे रुग्णांना नवजीवन देणारे माध्यम : डॉ. सुमय्या शेख

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुण्या डॉ. सुमय्या झरीन शेख म्हणाल्या की, फिजिओथेरपी हे केवळ उपचाराचे क्षेत्र नसून रुग्णांना नवजीवन देणारे एक पवित्र माध्यम आहे. आधुनिक काळात याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत असून विद्यार्थ्यांनी अद्ययावत तंत्रज्ञान आणि उपचार पद्धती आत्मसात करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, संशोधन आणि रुग्णसेवा यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल. त्यांनी महाविद्यालयाच्या उपक्रमांचे कौतुक करत रुग्णसेवा हीच खरी समाजसेवा असल्याचे त्या म्हणाल्या.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.३ जून २०२६



# १५ दिवस बंद राहिलेला हळद बाजार खुला; शेतकऱ्यांच्या मालाला मिळणार बाजार

हिंगोली / प्रतिनिधी

हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डातील हळद खरेदी-विक्रीचे व्यवहार १ जूनपासून पूर्ववत सुरू होणार आहेत. गेल्या पंधरा दिवसांपासून विविध अडचणींमुळे बंद असलेले व्यवहार पुन्हा सुरू होणार असल्याने हळद उत्पादक शेतकरी तसेच व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



मागील काही दिवसांपासून डिझेल टंचाईमुळे मालवाहतूक करणारी वाहने उपलब्ध होत नव्हती. परिणामी, व्यापाऱ्यांनी खरेदी केलेली हळद बाजार समितीच्या आवारातच साठून राहिली होती. मोठ्या प्रमाणावर हळदीच्या थप्प्या यार्डात पडून असल्याने नवीन मालासाठी जागा उपलब्ध होत नव्हती. हिंगोली बाजार समितीत दररोज मोठ्या प्रमाणावर हळद विक्रीसाठी येते. मात्र, यार्डातील साठा वाढल्याने शेतकऱ्यांकडून येणारी नवीन हळद स्वीकारणे अवघड झाले होते. त्यामुळे बाजार समिती प्रशासनासमोर मोठा पेच निर्माण झाला होता. एका बाजूला शेतकरी आपला माल विक्रीसाठी आणत होते, तर दुसऱ्या बाजूला व्यापाऱ्यांनी खरेदी केलेली हळद वाहतुकीअभावी यार्डातून बाहेर पडत नव्हती. यामुळे संपूर्ण व्यवहार प्रक्रियेवर परिणाम झाला. खरीप हंगामाच्या पेरण्या जवळ आल्याने बाजार समिती दीर्घकाळ बंद ठेवणे योग्य ठरणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. यानंतर व्यापाऱ्यांना बाजार समितीतील साठवलेली हळद इतरत्र हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या. व्यापाऱ्यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत यार्डातील हळदीच्या थप्प्या उचलून घेतल्या. त्यामुळे बाजार समिती परिसरात पुरेशी जागा उपलब्ध झाली असून खरेदी-विक्री व्यवहार पुन्हा सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. बाजार समितीतील व्यवहार बंद असल्यामुळे काही व्यापाऱ्यांनी खुल्या बाजारात हळदीचे दर कमी केल्याचे चित्र दिसून आले. याचा थेट फटका हळद उत्पादक शेतकऱ्यांना बसला. अनेक शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत नसल्याने नाराजी व्यक्त केली जात होती. मात्र आता बाजार समितीतील नियमित लिलाव सुरू झाल्यानंतर स्पर्धात्मक बोली लागण्याची शक्यता असून शेतकऱ्यांना चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. १ जूनपासून व्यवहार पूर्ववत होणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर हळद उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. खरीप हंगामासाठी आर्थिक तरतूद करण्याच्या दृष्टीने अनेक शेतकरी हळद विक्रीवर अवलंबून असल्याने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. हिंगोली बाजार समितीतील लिलाव पूर्ववत सुरू झाल्याने आगामी काळात हळदीच्या आवक आणि बाजारभावातही सकारात्मक बदल दिसून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शेळ्या-मेंढ्यातील आंत्रविषार; जाणून घ्या लक्षणे आणि उपचार!



शेळ्या, मेंढ्यामध्ये आढळणारा आंत्रविषार हा आजार पावसाळ्यात उगवलेले कोवळे लुसलुशीत गवत भरपूर प्रमाणात खाल्ल्यामुळे या आजाराचा प्रादुर्भाव दिसून येतो. हा आजार सर्व वयोगटातील शेळ्या-मेंढ्यांना होतो. परंतु लहान करडे/कोकरांमध्ये मृत्युदर जास्त दिसून येतो. हा आजार कमी कालावधीचा आहे. प्रादुर्भाव झाल्यापासून दोन ते बारा तासांत मृत्यू होतो. त्यामुळे या आजारावर प्रतिबंधक उपाय ( ) करणे फारच गरजेचे आहे.

आंत्रविषार आजाराची लक्षणे : शेळ्या-मेंढ्या निस्तेज दिसतात. एका जागेवर बसून राहतात. दूध पीत नाहीत. पातळ हिरव्या रंगाची संडास करतात. तोंडास फेस येतो, फिट येते. बाधित पिल्ले हवेत उडी मारून जमिनीवर पडतात. मान वाकडी होते. त्यांचा मृत्यू होतो. मोठ्या शेळ्या-मेंढ्या तीव्रतेनुसार काही दिवसांपर्यंत आजारी राहतात. ज्यामध्ये ताप येणे, तोंडातून फेस येणे, अडखळत चालणे, तोल जाणे, गोल फिरणे, चक्कर येणे तसेच श्वसनास त्रास होणे इत्यादी लक्षणे दिसतातफ शेवटच्या टप्यात पोटफुगी, जुलाब ही लक्षणे आढळून येतात. पोट फुगल्यामुळे जनावर उठबस करतात. सारखे पाय झाडतात.

आंत्रविषार आजारावर उपचार : हा अल्प मुदतीचा आजार असल्यामुळे प्रभावी उपचार करणे शक्य होत नाही. यासाठी अधिक खर्चसुद्धा होतो. पशुवैद्यकाच्या सहाय्याने विशिष्ट प्रतिजैविके दिल्यास पोटातील विष शोषण्याचे प्रमाण कमी होते, जीवाणूंची वाढ थांबते. कळपातील मरतुक कमी होऊ शकते. एखादे लिव्हर टॉनिक व शिरेवाटे ग्लुकोज दिल्यास फायदा होऊ शकतो.

प्रथमोपचार म्हणून लहान पिलांना हगवण सुरू झाल्यानंतर मिठाचे पाणी किंवा इलेक्ट्रोलाईट्सचे द्रावण पाजावे. आजारास प्रतिबंध करणे, अत्यंत सोपे, कमी खर्चाचे, व प्रभावी मध्यम आहे. मुख्यता लसीकरण व आहारातील व्यवस्थापन करून या आजाराचा प्रादुर्भाव टाळता येतो.

## डाळींबाची कोण जात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त

सध्या डाळींब शेतीला चांगले दिवस आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना चार पैसे मिळू लागले आहेत. यासाठी योग्य जात महत्वाची आहे. लागवडीमध्ये उच्च उत्पादनासाठी आपण ज्या जातींची लागवड करतो ते अतिशय महत्त्वाच्या असतात.

गणेश : या प्रकारच्या डाळिंबाचे फळ आकाराने खूप मोठी असते. मोठी, साल लाल आणि पिवळ्या रंगाचे मिश्रण असते. बिया मऊ गुलाबी असतात. ही महाराष्ट्रातील व्यावसायिक शेती आहे. एका झाडापासून सरासरी उत्पादन ८ ते १० किलो असते. ही जात १९३६ मध्ये विकसित करण्यात आली. १९७० मध्ये त्याचे नाव ॲलन डी वरून बदलून गणेश असे करण्यात आले. या जातीच्या एका फळाचे वजन २०० ते ३०० ग्रॅम असते. गोड, रसाळ आणि जेवणात रुचकर, त्याच्या दाण्यांचा रंग हलका गुलाबी असतो. एका झाडाला ८ ते १२ किलो फळ मिळते .

कमान : हे फळ गणेश जाती पेक्षा लहान असून मऊ बिया असलेले गडद लाल आहे. मऊ : बिया गडद लाल आहेत त्यात मुख्यत: गणेश प्रकाराचा समावेश आहे.

बहर : सरासरी प्रत्येक फळांचे वजन सुमारे २५० ते ३०० ग्रॅम असते.

मस्कत : या प्रजातीच्या फळांमध्ये गुलाबी बिया असतात. ज्यांचा वरचा भाग लाल असतो. फळांचे वजन सरासरी ३०० ते ३५० ग्रॅम असते.

ज्योतिष : हा प्रकार आयआयएचआर, बेंगलोरने विकसित केला आहे. फळे मोठी, चमकदार रंगाची असतात. आणि बिया जास्त रसाने मऊ असतात. या प्रकारची फळे दुष्काळ सहन करतात कारण ती झाडांच्या फांद्यामध्ये असतात.

रुबी : ही प्रजाती देखील आयआयएचआरने बंगळुरूमध्ये विकसित केले आहे. साल लालसर तपकिरी असते.आणि हिरव्या रेषा लाल असतात. फळांचे वजन २७० ग्रॅम आहे आणि सरासरी उत्पादन १६ ते १८ टन प्रति हेक्टर आहे.

ढोलका : फळे आकाराने खूप मोठी आहेत आणि विशेषत: गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढतात.



## झाडावरील केळीचे घड पिशवीने झाकण्यामुळे होतात हे आश्चर्यकारक फायदे!

केळी उत्पादक शेतकरी केळीचे घड पिशव्यांनी झाकतात. ही एक सामान्य कृषी पद्धत आहे ज्यामुळे फळांचे विविध पर्यावरणीय घटक, कीटक आणि रोगांपासून संरक्षण होते. सामान्यत: या पिशव्या पॉलिथिन, न विणलेले फॅब्रिक किंवा कागदासारख्या सामग्रीपासून बनविलेले असतात. केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने अनेक फायदे मिळतात. आधुनिक केळी शेतीमध्ये ही एक आवश्यक क्रिया आहे. केळीचे घड पिशवीने झाकण्याचे अनेक फायदे आहेत. कीटक आणि रोगांपासून संरक्षण : केळीचे घड पिशवीत ठेवण्याचे मुख्य फायदे म्हणजे ते विविध कीटक आणि रोगांपासून संरक्षण प्रदान करते. फुलकिडी, फळमाशी आणि इतर कीटक यांसारख्या कीटकांमुळे केळीच्या फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते, ज्यामुळे चट्टे, डाग आणि इतर गुणवत्तेच्या समस्या निर्माण होतात. तसेच या किडी आणि रोगांना पिशव्या अडथळा म्हणून काम करतात, ज्यामुळे या कीटकांना फळांपर्यंत पोहोचण्यापासून प्रतिबंध होतो. आर्द्र वातावरणात जेथे करपा आणि सिगार रॉट सारख्या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो. बॅगिंगमुळे एक सूक्ष्म वातावरण तयार होते जे फळांच्या पृष्ठभागाशी ओलावा कमी करते, ज्यामुळे अशा रोगांचे प्रमाण कमी होते. यामुळे रासायनिक कीटकनाशकांची गरज कमी होते, त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होते. सुरक्षित, कीटकनाशकमुक्त फळ उत्पादित होते. याव्यतिरिक्त, पावसाळ्यात फळांना पिशव्या मातीच्या कणांपासून दूषित होण्यास प्रतिबंध होते.फळांची चांगली गुणवत्ता : केळीची गुणवत्ता वाढवण्यात बॅगिंग महत्त्वाची भूमिका बजावते. पिशव्या धूळ, घाण आणि यांत्रिक नुकसान यासारख्या बाह्य घटकांपासून फळांचे संरक्षण करतात. परिणामस्वरुप, केळी गुळगुळीत त्वचेसह एकसमान आकार विकसित करतात, त्यावर कोणतीही खूण किंवा डाग नसतात. निर्यातक्षम केळीसाठी हे अतिशय महत्त्वाचे आहे. केळीची गुणवत्ता हा बाजारभावाचा एक महत्त्वाचा निर्धारक आहे. याव्यतिरिक्त, पिशव्या सूर्य प्रकाशामुळे होणारी सन बर्निंग कमी करण्यास मदत करते, थेट सूर्यप्रकाशापासून फळांचे संरक्षण करून, बॅगिंग केळीचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवते, ज्यामुळे ग्राहक आकर्षित होतात. त्यामुळे शेतकर्यांना बाजारात जास्त भाव आणि अधिक नफा मिळतो.



फळांची चांगली वाढ आणि परिपक्वता : केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने फळांच्या सभोवतालच्या सूक्ष्म वातावरणावर सकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे फळांची वाढ, आकार आणि परिपक्वता चांगली राहते. पिशव्या फळांच्या सभोवतालच्या ओलाव्याची योग्य पातळी राखण्यास मदत करतात, जे फळ भरण्यासाठी आणि विकासासाठी आवश्यक आहे. हे नियंत्रित वातावरण फळांचे वजन आणि आकार सुधारू शकते, ज्यामुळे प्रति घड जास्त उत्पादन मिळते. शिवाय, बॅगिंगमुळे केळी मजबूत होतात आणि त्यांचे शेल्फ लाइफ वाढते, जे स्थानिक बाजारपेठ आणि निर्यात दोन्हीसाठी फायदेशीर आहे.

काढणी नंतरचे नुकसान कमी करणे : काढणीनंतर, विशेषतः हाताळणी, वाहतूक आणि साठवण दरम्यान केळीचे लक्षणीय नुकसान होते. कापणीपूर्व अवस्थेत बॅगिंगमुळे संरक्षणाचा अतिरिक्त थर देऊन हे नुकसान कमी करण्यात मदत होते. फळांचा दर्जा चांगला आणि नुकसानीचा प्रादुर्भाव कमी होतो. म्हणजे पॅकिंग अवस्थेत आणि वाहतुकीदरम्यान कमी फळे खराब होतात. याव्यतिरिक्त, बॅगिंगमुळे पिशव्या फळांमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे फळांचे वजन कमी होत नाही. उच्च तापमान असलेल्या भागात किंवा कोरड्या हंगामात जेव्हा निर्जलीकरणाचा धोका जास्त असतो तेव्हा हे विशेषतः महत्त्वाचे आहे.

पर्यावरणास अनुकूल : कीटकनाशकांच्या अति वापरासाठी बॅगिंग हा पर्यावरण पूरक पर्याय आहे. रासायनिक हस्तक्षेपाची गरज कमी करून, ही पद्धत केळीच्या टिकाऊ उत्पादनात योगदान देते. हे सेंद्रिय आणि कीटकनाशकमुक्त उत्पादनासाठी देते. बायोडिग्रेडेबल किंवा पुन्हा वापरता येण्याजोग्या पिशव्या वापरल्याने टिकाऊपणा आणखी वाढते, ज्यामुळे पर्यावरणीय प्रभाव कमी होतो.

खर्चात बचत : पिशव्यांमधील सुरुवातीची गुंतवणूक अतिरिक्त खर्चासारखी वाटत असली तरी कीटकनाशके, फळांचा दर्जा आणि उच्च बाजारभाव या दृष्टीने दीर्घकालीन फायदे बॅगिंगला किफायतशीर पर्याय बनवतात. उत्पादनात वाढ आणि काढणी नंतरच्या नुकसानीतील घट यामुळे बॅगिंगची गुंतवणूक अधिक योग्य वाटते.

हवामानास अनुकूल : अतिवृष्टी किंवा जोरदार वारा यांसारख्या परिस्थितीत, बॅगिंगमुळे फळांच्या घडांना अतिरिक्त संरक्षण मिळते. पिशव्या गारपीट, मुसळधार पाऊस आणि काही बाबतीत पानांमुळे होणारे नुकसान कमी करण्यास मदत करतात. यामुळे हवामानातील बदलांशी जुळवून घेण्यासाठी आणि बदलत्या हवामानाच्या पद्धती असूनही सातत्यपूर्ण उत्पादन सुनिश्चित करण्यासाठी बॅगिंग हा एक मौल्यवान उपाय आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजीमहाराजांनी राजा जयसिंगची भेट घेऊन त्यांच्याबरोबर सलोख्याची बोलणी करण्यासाठी त्याच्या शिबिरामध्ये प्रवेश केला.
१७७६ : अमेरिका देशाला स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी घोषणापत्र तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली.
१८६६ : अलाहाबाद उच्च न्यायालयाची स्थापना.
१८९५ : पॅरिस-बॉर्डोक्स-पॅरिस ही इतिहासातील पहिली ऑटोमोबाईल रेस किंवा पहिली मोटर रेस झाली.
१९०१ : न्यूझीलंडने कूक बेटे बळकावली.
१९०७ : नॉर्थनम्प्टनशायर क्रिकेट संघ १२ धावांत सर्वबाद.
१९२१ : ब्राझील देशांतील महिलांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला.
१९३५ : एडविन आर्मस्ट्राँगने पहिल्यांदा एफ.एम. लहरींचे प्रसारण केले.
१९३७ : जोसेफ स्टालिनने आपल्याच ८ लष्करी अधिकार्यांना ठार केले.
१९५५ : जगातील पहिल्या मैग्नेशियम जेट विमानाने भरारी घेतली.
१९६४ : पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थ्या संपूर्ण देशभर विसर्जित करण्यात आल्या.
१९७० : ॲनामे हेस, एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन या अमेरिकन सैन्यातील पहिल्या स्त्री जनरल झाल्या.
१९७२ : दारू पिउन रेल्वे चालवल्यामुळे एल्थाम वेल हॉल येथे रेल्वे अपघात होऊन ६ जण ठार व १२६ जण जखमी झाले.
१९९७ : सुखोई-३०के ही रशियन बनावटीची विमाने भारतीय हवाई दलात दाखल.
१९९८ : कॉम्पॅक कॉम्पुटर कंपनी ने डिजिटल एक्विपमेंट कॉर्पोरेशन विकत घेण्यासाठी ९ अब्ज अमेरिकी डॉलर मध्ये इतिहासातील सर्वात मोठा सौदा केला.
१९८७ : १६० वर्षांच्या कालखंडात ब्रिटीश देशाच्या पंतप्रधान पदावर सलग तिसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर या पहिल्या ब्रिटीश नागरिक ठरल्या.
२००४ : कॅसिनी-हायगेन्स अंतराळयान शनिचा उपग्रह फीबी जवळून गेले.
२००७ : बांगलादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.
२००८ : भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीन वाजेद यांची सुटका करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : भारतीय-श्रीलंकन छायाचित्रकार जुलिया मार्गारेट कॅमेरॉन यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८७९)
१८८० : अमेरिकेचे पहिले संसद सदस्य रैफिन यांचा जन्मदिन.
१८९४ : टोयोटा मोटर कंपनीचे संस्थापक काइचिरो टोयोडा यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९५२)
१८९७ : क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)
१९०९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व राजकारणी तसचं, निट्टे एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक के.एस. हेगडे यांचा जन्मदिन.
१९२४ : साली भारतीय व्यंगचित्रकार, पत्रकार आणि लेखक अत्तूपुरथू मॅथ्यू अब्राहम उर्फ अबू अब्राहम यांचा जन्मदिन.
१९३७ : साली पद्मभूषण व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय नर्तक, नृत्यदिग्दर्शक आणि शैक्षणिक तसचं, नालंदा नृत्य संशोधन केंद्राच्या संस्थापक-दिग्दर्शिका आणि मुंबईतील नालंदा नृत्य कला महाविद्यालयाच्या संस्थापक-प्राचार्या कनक रेले यांचा जन्मदिन.
१९४२ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय उत्प्रेरक वैज्ञानिक, आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे माजी संचालक पॉल रत्नसामी यांचा जन्मदिन.
१९४८ : बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा जन्म.
१९८२ : टंबलर चे सहसंस्थापक मार्को आर्मेंट यांचा जन्म.
१९८९ : भारतीय पॅरा-बॅडमिंटनपटू मानसी गिरीशचंद्र जोशी यांचा जन्मदिन.
१९९० : साली अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय हॉकी पटू सविता पुनिया यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

३२३इ.पुर्व : मॅसेडोनियाचा राजा अलेक्झांडर द ग्रेट यांचे निधन. (जन्म: २० जुलै ख्रिस्त पूर्व ३५६)
१७२७ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचे निधन. (जन्म: २८ मे १६६०)
१९०३ : सर्बियाचा अलेक्झांडर (पहिला) यांची सर्बियन पत्नी ड्रगा माशिन यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १८६४)
१९२४ : इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी वासुदेव वामन तथा वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८५८)
१९५० : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी भाषिक लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यसेनानी तसचं, भारतीय राष्ट्रीय शिक्षक म्हणून ओळखले लोकप्रिय असणारे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांचे निधन.
१९८३ : घन:श्याम बिर्ला, भारतीय उद्योगपती. (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९७ : भारतीय सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय दूर अंतरीय जलतरणपटू आणि व्यावसायिक तसचं, इग्लिश खाडी पार करणारे पहिले भारतीय नागरिक मिहीर सेन यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९३०)
२००० : राजेश पायलट, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री. (जन्म: १० फेब्रुवारी १९४५)

# ९८ उद्योजक महिलांना पोर्णिमा यांच्या हस्ते MSME प्रमाणपत्र वाटप

जालना । प्रतिनिधी

हस्तमल बंब आणि सतीश पंच यांच्या प्रयत्नामुळे व्यापारी महासंघ राज्यात अव्वल – खंडेलवाल सौ. मोहिते, सौ. अय्यर, सौ. जोशी यांना उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार .दि. २ जून रोजी

उद्योग मंत्रालय महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुंबई येथील सौ. पोर्णिमा शिरीषकर महिला कार्यशाळेत मार्गदर्शन करताना म्हणाल्या आजच्या या कार्यक्रमाच्या मुख्य उद्देश सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रातील लहान सहान उद्योग व्यवसायातील महिलांना सक्षम करणे, तसेच विविध शासकीय योजना, कर्ज अनुदान बदल सखोळ माहिती देणे हे आहे. गरजुं महिलांनी पुढे येऊन आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत योगदान द्यावे. उद्योग व्यवसायची निवड, उद्यम नोंदणी, बैंक खाते उघडणे, भांडवल उभारणी, वित्त पुरवठा इ. योजना व तसेच व्यवसायची वाढ, उत्पादनाचे प्रभावी विपणन, स्थानिक ते अंतरराष्ट्रीय बाजारपेठा पर्यंत पोहचवण्याची संधी, सोशल मिडिया, डिजिटल मार्केटींग, शासनाच्या विविध पोर्टल्स्? वर नोंदणी इ. वर सौ. पोर्णिमा यांनी सखोळ मार्गदर्शन केले. दि. ३१ मे २०२६ रविवार रोजी, व्यापारी महासंघ व जनरल मर्चन्ट तर्फे एक दिवसीय शिबीर जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे आयेजित करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून सौ. शिरीषकर तर कार्यक्रमाचे अध्यक्ष पद मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून खंडेलवाल ज्वेलर्सचे, नितीन खंडेलवाल व राज्य उपाध्यक्ष सतिष पंच, छ. संभाजीनगर येथून उद्योग केंद्राचे विभागीय अधिकारी सौ. दिप्ती नायर, अनुज शर्मा, शैलेंद्र सिंह व आयोजक महिला आघाडिची मराठवाडा अध्यक्षा सौ. सिता मोहिते, सचिवा सौ. आनंदी अय्यर, जिल्हाध्यक्षा सौ. प्रिया जोशी मंचावर उपस्थित होते. शिबीराचे शुभारंभ दीप प्रज्वलन करून करण्यात आले. सौ. जोशी यांनी प्रास्ताविक करताना शहरातील ग्रामीण भागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या बदल कौतुक करून धन्यवाद दिले. सौ. अय्यर मनोगत व्यक्त करताना मागील एक महिण्या पासून महिलांची टीम अथक कष्ट व मेहनेत करून सदर कार्यशाळा भव्य दिव्य होण्यास प्रयत्न करीत होती व यात आम्हाला यश मिळाला आहे. सौ. मोहिते म्हणाल्या अशी प्रकारची कार्यशाळा मराठवाडाच्या प्रत्येक जिल्हयात आयोजित करु. श्री पंच म्हणाले जालना जिला महिला कार्यकारणीच्या पेटेंट वर संपूर्ण राज्यात काम होणे गरजेचे आहे. श्री



खंडेलवाल यांनी सातत्याने प्रेरणादायी वाचन करण्याचे महत्व अधोरिखित केले. योग्य ज्ञान व नियोजनाच्या आधारे व्यवसायाच्या विस्तार करावा, तसेच उत्पन्न वाढीसाठी विविध संधीचा विचार करावा, माझे राज्यात दहा मोठ्या शहरात ज्वेलर्सचा उद्योग शोरुम आहे. पण व्यापारी संघटनेत महिलांचा इतका मोठा सहभाग मी प्रथमच पाहिला आहे व संपुर्ण जिल्ह्यात उद्योजक व्यापऱ्यांचा फार मोठा संघटन जालन्यात आहे, म्हणून राज्यस्तरीय पुरस्कार सुध्दा जालनाला मिळालेला आहे. बंब आणि पंच मुळेच व्यापारी महासंघ जालना जिला चे कार्य राज्यात अव्वल आहे, असे खंडेलवाल म्हणाले. अध्यक्षीय भाषण करताना श्री बंब म्हणाले मागील महिण्यात महाराष्ट्रात प्रथमच महिला जिल्हा अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. शासनाची अनेक योजना, अनुदान, नाममात्र व्याजने कर्ज उपलब्ध आहे. त्यासाठी उद्यम आधार व प्रमाणपत्र होणे आवश्यक आहे. अनेक गरजु महिलांचे प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्र, अग्रणीय बँक कडे दाखल करण्यात आले आहे. काही महिलांचे प्रस्ताव मंजुर सुध्दा झाले आहे. येत्या वर्षात जिल्ह्यातील १००० उद्योग व्यवसायातील महिलांना शासकीय योजना मिळवून देण्याचे संकल्प आहे, असे बंब म्हणाले. जिल्ह्यातील उद्यम आधार असलेले महिलांची निवड करून ९८ लहान–सहान उद्योजक महिलांना शासकीय प्रमाणपत्र सौ. पोर्णिमा शिरीषकर यांच्या हस्ते देण्यात आले. जालना जिला व्यापारी महासंघ, महिला आघाडीच्या राज्यात उत्कृष्ठ कार्या बद्दल सौ. मोहिते, सौ. अय्यर, सौ. जोशी यांना शासना तर्फे अभिनंदन पत्र प्रदान करून पुरुस्कृत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनुसया देवकाते, सुनिता पाटील, पुनम शेळके, ज्ञानेश्वर देवकाते, विनोद अग्रवाल, संजय राठी, संजय सेठिया, सय्यद जाकेर, कृष्णा टेकाळे, तुळशीराम वैद्य, ॲड. सुब्रम्हण्यम अय्यर, राम मोहिते, प्रमोद जोशी, श्री शेळके इ. परिश्रम घेतले. शिबिरात जिल्ह्यातील मोठ्या संख्यने महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्र संचालन ॲड. अभय सेठिया, सौ. सुप्रिता रायबागकर यांनी केले, तर आभार सचिवा सौ. संगिता पांगारकर यांनी मांडले.

## श्री मत्स्योदरी मंदिरात २० केव्ही सौरऊर्जा प्रकल्पाची उभारणी



अंबड। प्रतिनिधी

मराठवाडचात प्रसिद्ध असलेली श्री मत्स्योदरी देवी संस्थान अंबड या मंदिरा साठी २० सोलर बसविण्यात आली. संस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार श्री विजय चव्हाण सचिव तथा नायब तहसीलदार श्री एकनाथ भोजने यांच्या मार्गदर्शनाखाली सोलर बसविण्यात आले. संस्थान च्या सोलर साठी कोणत्याही बँकेने संस्थान ला सहकार्य केले नाही. यासाठी देवगिरी संस्था यांनी संस्थानला ८,५०,००० रू कर्ज दिले. २० चे सोलर ३४ प्लेट मध्ये पूर्ण केले. पूर्णवेळ लाईट पुरवण्यासाठी बॅटरी बसवण्याची राहिली आहे . ते कार्य पुढील काळात पूर्ण होईल. या साठी अंबड येथील विद्युत कर्मचारी श्री वाल्मीक सांघुळे व त्यांची टीम ने सहकार्य करून पूर्ण केले व देवगिरी पथसंस्था संचालक आणि व्यवस्थापक टीम यांचे सहकार्य केल्या बद्दल संस्थान पुजारी श्री गीता विलास खुंटेफळकर आणि व्यवस्थापक श्री कैलास शिंदे यांनी आभार मानले.

## ग्रामपंचायतींची प्रभाग आरक्षण सोडत १२ जून रोजी

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या आणि नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या प्रभाग आरक्षण सोडतीचा अधिकृत कार्यक्रम जिल्हा प्रशासनाने जाहीर केला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील ६३८ ग्रामपंचायतींची प्रभाग आरक्षण सोडत १२ जून रोजी काढण्यात येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या विविध याचिकांवरील निर्णय आणि बांठिया आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी (ओबीसी) नव्याने आरक्षण प्रक्रिया राबवली जाणार आहे. सन २०२४ मध्ये मुदत संपलेल्या कन्नड तालुक्यातील ३ ग्रामपंचायती (रामनगर, विटा व पळसखेडा–खापरखेडा) आणि सन २०२५ मध्ये मुदत संपलेल्या गंगापूर तालुक्यातील २ ग्रामपंचायती (ईटावा व घाणेगांव) यांच्या प्रभाग आरक्षणाची पूर्वी प्रसिद्ध केलेली अंतिम अधिसूचना राज्य निवडणूक आयोगाने रद्द केली आहे. त्यामुळे या सर्व ५ ग्रामपंचायतींसाठी आता सन २०२६ च्या नवीन नियमांनुसार पुनश्च आरक्षण सोडत काढली जाईल. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी (ओबीसी) राखून ठेवावयाच्या जागा एकूण जागांच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील.

अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (ओबीसी) यांचे एकत्रित एकूण आरक्षण ग्रामपंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही. एकूण जागांपैकी ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित असतील आणि त्याची सोडत चक्रानुक्रमे फिरवली जाईल. जिल्हाधिकारी जी. सी. गौडा यांनी याबाबतचे आदेश नुकतेच जारी केले आहेत.

## एसटी महिला कर्मचारी मारहाण प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील एसटी आगारातील कर्मचारी महिला नामे जयश्री बाबुराव गूठे चेमटे वय (३१) यांच्यावर अहिल्यानकडे जात असलेली एसटी बस क्रमांक २० ४१६१ तिसगाव येथे वाहतूक थांबल्यावर थांबली असता आरोपी ऋषिकेश मरकड व इतर अनोळखी तीन इसम हे बसमध्ये चढले व एसटी महिला कर्मचारी जयश्री गुठे यांच्याबरोबर हुज्जत घालून अश्लील शिवीगाळ करू लागले या झटपटीमध्ये त्यातील आरोपी ऋषिकेश मरकड याने महिला कर्मचारी जयश्री गुठे यांना मारहाण केली असता त्यांच्या गळ्यातील १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनीगंठण गहाळ झाले हा प्रकार पाहता एसटी चालक एकनाथ घनश्याम चेमटे हे आरोपींना समजून सांगत असताना त्यांनाही आरोपींनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केली हा प्रकार व्हिडिओ रेकॉर्डिंग मध्ये कैद झाला व वाऱ्यासारखा तालुक्यात पसरला एसटीतील व वाहतूक थांबल्यावरील काही प्रवाशांनी आरोपी ऋषिकेश मरकड याला चांगलाच लाथा बुक्क्यांनी प्रसाद दिला सदरील घटनेचे गांभीर्य पाहून पाथर्डी एसटी आगारातील एसटी कर्मचारी जनसंघ संघटने पाथर्डी पोलीस स्टेशन येथे धाव घेत आरोपी ऋषिकेश मरकड आणि अनोळखी इतर तीन इसम यांच्यावर यावर भारतीय न्याय संहिता कलम १३२,७४,११५,(२), ३५२, ३५१(२),३२४ (२),३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे आरोपी ऋषिकेश मरकड व इतर तीन इसम फरार असून पुढील तपास पाथर्डी पोलीस करत आहे.

एसटी कर्मचाऱ्यावरील वाढते हल्ले रोखण्यासाठी कठोर कायदा करण्याची आवश्यकता असल्याचे मत एसटी कर्मचारी जनसंघाचे प्रतिनिधी दत्तात्रय खेडकर यांनी व्यक्त केले याबाबत लवकरच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन पाथर्डी तालुक्यातील एसटी महिला कर्मचारी मारहाण प्रकरणी आरोपींना तातडीने अटक आणि कठोर शासन व्हावे यासाठी निवेदन देणार असल्याचे एसटी जनसंघ कर्मचारी संघटनेने सांगितले आहे.

### टीसी हरवला आहे

दिपाली प्रकाश पारदे या नावाची मत्स्योदरी विद्यालय अंबड .जि.जालना या शाळेची १० वी पासची टीसी प्रवास दरम्यान हरवली आहे सापडल्यास या नंबर वर संपर्क साधावा
संपर्क
९८२२८५५७१३

### टीसी हरवला आहे

आदर्श अण्णा चौरे या नावाचा १० वी पास चा टीसी पाटोदा ते तळेपिंपळगाव बस प्रवासा दरम्यान हरवला आहे. सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा
संपर्क
९४२१७७१३९६

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२–४८३–२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–११२७**
**दिनांक – २८/११/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती बाळू रामभाऊ जाधव रा. गोंदीतांडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | संघर्ष बाळू जाधव | मुलगा | ०७/०५/२०१३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## भटके–विमुक्तांच्या घरगणना–जनगणनेसाठी मुशाफिरी यात्रा: ॲड.अरुण जाधव

जामखेड । प्रतिनिधी

भटके–विमुक्त समाजाची स्वतंत्र घरगणना व जनगणना व्हावी, या प्रमुख मागणीसाठी उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागात मुशाफिरी यात्रेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भटक्यांचे नेते तथा नगरसेवक ॲड. डॉ. अरुण जाधव यांनी दिली. भटके–विमुक्त समाजातील अनेक कुटुंबे पाल, कुड व कोपीमध्ये वास्तव्यास आहेत. मात्र, शासनाच्या घरगणनेच्या ऑनलाइन प्रक्रियेत अशा निवाऱ्यांची नोंद करण्यासाठी स्वतंत्र रकानाच नसल्याने या समाजाची अचूक



घरगणना होत नसल्याचा आरोप त्यांनी केला. भटके–विमुक्त समाज सतत उपजीविकेसाठी भटकंती करत असल्याने त्यांच्या जनगणनेचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

जनगणना न झाल्यास या समाजासाठी आवश्यक असलेले अर्थसंकल्पीय नियोजन, विकास निधी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळू शकत नाही. त्यामुळे भटके–विमुक्त समाजाला संविधानाने दिलेल्या अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत अधिकारांच्या अनुषंगाने न्याय मिळावा, अशी मागणी त्यांनी केली. या पार्श्वभूमीवर भटके–विमुक्तांच्या न्याय हक्कांसाठी पाल, वस्ती व वाड्यांवर जाऊन संवाद साधण्यासाठी मुशाफिरी यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा सुमारे आठ जिल्ह्यांतील दीडशेहून अधिक भटके–विमुक्त वस्त्यांना भेट देणार असल्याचे ॲड अरुण जाधव यांनी सांगितले.

## दुसऱ्याही तरुणाचा मृतदेह सापडला; कुटुंबाचा आक्रोश

पैठण । प्रतिनिधी

येथील नाथसागर धरणाच्या पाण्यात पोहण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथून आलेल्या दोन तरुणाचा रविवारी दि.३१ रोजी पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. घटना घडल्याच्या काही तासाने पैठण पोलीस, अग्निशामक दल व युवकाच्या पथकाने पाण्यामध्ये शोध कार्य करून संकेत सिद्धार्थ खरात (१८ वर्ष) याचा मृतदेह पाण्याबाहेर काढला होता. परंतु यावेळी बुडालेल्या दुसऱ्या तरुणाचा मृतदेह शोध कार्य चालू असताना अंधार पडल्यामुळे शोध मोहीम थांबविण्यात आली होती. आता त्याही तरूणाचा मृतदेह सापडला आहे. यावेळी कुटुंबाचा आक्रोश ऐकावयास मिळाला.

सोमवारी (दि.१ जून) सकाळी पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, सपोनि चंद्रकांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वैभव सारंग, बीट जमादार राजेंद्र जिवडे, पालवे, चव्हाण व नगरपरिषद अग्निशमन दलाचे जवान पथकातील अमोल शेजुळ,जब्बी धांडे,अनिल गायकवाड, ईश्वर मिसाळ,आकाश जगधने,रफीक धांडे,जफर शेख,शुभम रुपेकर,सुधीर नलभे यांच्या मदतीने शोध मोहीम सुरू करण्यात आली. यावेळी पाण्यामध्ये नऊ वाजेच्या दरम्यान शोध कार्य करताना पाण्यात बुडालेला दुसरा तरुण अनिकेत मनू भारती (वय : १९ वर्ष, रा. अंबिकानगर, छत्रपती संभाजीनगर) याचा मृतदेह आढळून आला. सदरील तरुणाचा मृतदेह पैठण येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन नेण्यात आला. या तरुणाचे नातेवाईक रात्रीपासूनच नाथसागर धरणावर दाखल होऊन आक्रोश करीत होते.

# राज्यस्तरीय पुरस्काराने बाबासाहेब शेळके व त्यांची पत्नी सविता यांचा गौरव

अंबड । प्रतिनिधी

बी एस एफ बहुउद्देशीय संस्था अमरावती अपेक्षित नायक न्यूज संत कबीर बहुउद्देशीय संस्था बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित यांच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ हा पुरस्कार डोमेगाव तालुका अंबड येथील सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब राधाकिसन शेळके व त्यांची पत्नी सामाजिक कार्यकर्त्या सविता बाबासाहेब शेळके यांना प्रदान करण्यात आला सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली रविवारी ३१ मे २०२६ रोजी नाशिक येथील



निलगिरी बाग परिसरातील धनलक्ष्मी गार्डन बॅंकवेट हॉल येथे आयोजित भव्य समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला या सोहळ्यात डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांच्या हस्ते बाबासाहेब शेळके व त्यांच्या पत्नी सविता शेळके यांना शुभ हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला अपेक्षित नायक न्यूज व कार्यक्रमाचे अध्यक्ष भूषण निळकंठ सरदार हिंदू मंजूर संघ महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष श्री कार्तिक अर्जुन डांगे डॉक्टर रावसाहेब घोडेराव वैशाली माधवराव सोनवणे अशोकराव सदाशिव पाटील नागरे रितिका सोळुंके लीलावती भाऊराव कापडणीस माजी गृहपाल या कार्यक्रमाला मान्यवर उपस्थित होते सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागात विविध उपक्रमाच्या माध्यमातून समाज प्रबोधन जनजागृती ओ सामाजिक कार्यात सक्रिय योगदान दिल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब शेळके व त्यांच्या पत्नी सामाजिक कार्यकर्त्या सविता बाबासाहेब शेळके यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर डोमेगाव व परिसरातील विविध स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

पुरस्कार स्वीकारते वेळी त्यांची पत्नी सविता शेळके व चिरंजीव अभिषेक शेळके उपस्थित होते या कार्यक्रमांमध्ये विशेष बाबासाहेब शेळके व सविता शेळके यांच्या घनदाट वृक्ष लागवडीची चित्रफीत दाखवून सर्व मान्यवरांचे लक्ष वेधले

दैनिक
# राज्य लोकतंत्र
बुधवार दि.०३ जून २०२६


# महत्त्वाकांक्षी खुंटेफळ साठवण तलाव योजनेला मिळणार गती

## आष्टीत नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र.२ चे मुख्यालयाचे आ.सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन

आष्टी । प्रतिनिधी

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र. २ चे कार्यकारी अभियंता कार्यालय आष्टी तालुक्यातील जळगाव येथे नव्याने सुरू करण्यात आले असून, या मुख्यालयाचा उद्घाटन समारंभ आ.सुरेश धस यांच्या हस्ते फीत कापून उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

आष्टी तालुक्यासह परिसरातील सिंचन, जलसंपदा आणि भूसंपादनाशी संबंधित विविध प्रशासकीय कामे अधिक प्रभावीपणे व जलदगतीने पार पडावीत, या उद्देशाने हे कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांना विविध कामांसाठी दूरवर जावे लागणार नसून, त्यांच्या अनेक प्रश्नांचे निराकरण स्थानिक पातळीवरच होणार आहे.

यावेळी बोलताना आ. सुरेश धस यांनी सांगितले की, जलसंपदा विभागाची यंत्रणा तालुकास्तरावर उपलब्ध झाल्याने भूसंपादन प्रक्रिया, कालवा व्यवस्थापन, सिंचनाशी संबंधित तांत्रिक बाबी तसेच विविध विकासकामांना गती मिळेल. विशेषतः खुंटेफळ साठवण तलावात उपसा सिंचनाद्वारे



पाणी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेला या कार्यालयामुळे चालना मिळणार आहे. त्यामुळे शेतीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता वाढून परिसरातील कृषी विकासाला मोठी मदत होईल.

तसेच भविष्यात आष्टी मतदारसंघातील विविध गावांना आणि प्रकल्पांना पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा करण्याच्या योजनांच्या नियोजन व अंमलबजावणीसाठीही हे कार्यालय महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार असल्याचे त्यांनी नमूद केले. जलसंपत्तीचे सुयोग्य नियोजन करून शेती, पिण्याचे पाणी आणि विकासकामांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

स्थानिक पातळीवर कार्यालय सुरू झाल्याने नागरिक, शेतकरी आणि विविध लाभार्थ्यांची कामे अधिक सोयीस्कर व वेळेत पूर्ण होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या उद्घाटन समारंभास नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र. २ चे कार्यकारी अभियंता श्री. कृष्णा घुगे, कर्डिले साहेब, तसेच जलसंपदा विभागातील विविध अभियंते, अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# तीन कर्मचाऱ्यांवर चौसाळा डीसीसी बँकेचा कारभार

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा सध्या केवळ तीन कर्मचाऱ्यांच्या भरोशावर सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. चौसाळा शहरासह परिसरातील तब्बल ३५ गावांतील शेतकरी, व्यापारी तसेच नागरिकांचे आर्थिक व्यवहार याच शाखेमार्फत होत असल्याने बँकेत दररोज मोठी गर्दी होत आहे. मात्र अपुऱ्या मनुष्यबळामुळे ग्राहकांना तासंतास प्रतीक्षा करावी लागत असून अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

सध्या शाखेत व्यवस्थापक म्हणून बाळासाहेब ताटे, कॅशिअर श्री. जाधव आणि तपासनीस श्री. फुलारी हेच तीन कर्मचारी कार्यरत आहेत. एवढ्या मोठ्या शाखेचा कारभार अवघ्या तीन कर्मचाऱ्यांवर चालत असल्याने कामाचा ताण प्रचंड वाढला आहे. विशेषतः पीककर्ज, ठेव व्यवहार, शासकीय योजना, अनुदान वितरण तसेच दैनंदिन आर्थिक व्यवहारासाठी ग्रामीण भागातील शेतकरी मोठ्या प्रमाणात बँकेत येत असतात. त्यामुळे अनेकदा ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून येते. शेतकरी वर्गाला कर्जप्रकरणे, खाते अद्ययावत करणे, पैसे काढणे व जमा करणे यासाठी वारंवार बँकेत फेऱ्या माराव्या लागत आहेत. काही वेळा सर्व्हर समस्या आणि कमी कर्मचारी यामुळे वाढत्या कामाच्या ताणामुळे विद्यमान कर्मचाऱ्यांचीही तारांबळ उडत असून व्यवस्थापकांवर संपूर्ण शाखेची जबाबदारी पडली आहे. व्यवस्थापक बाळासाहेब ताटे यांच्या सहकार्यामुळे नागरिकांचे कामे होत असल्याने त्यांच्या कामाबद्दल समाधान व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या सहकारी बँकांमध्ये पुरेसे कर्मचारी उपलब्ध असणे आवश्यक असताना चौसाळा शाखेतील परिस्थिती मात्र चिंताजनक बनली आहे. त्यामुळे या शाखेत तातडीने नवीन कर्मचारी नियुक्त करून शेतकरी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातील नागरिक व ग्राहकांकडून होत आहे.

# कोणतीही परवानगी न घेता डोंगर पिंपळा इमारतीचे बांधकाम; बांधकाम विभागाच्या अहवालात उघडकीस

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील डोंगर पिंपळा ग्रामपंचायत कार्यालय यांना त्या कारणाने सातत्याने चर्चेत असते डोंगर पिंपळा ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतीसाठी प्रशासकीय स्तरावर निधीही मंजूर झाला आहे त्यानुसार नवीन इमारतीचे बांधकाम चालू असून बांधकामाचा काही भाग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेत येत असल्याबद्दल आज ना उद्या भविष्यकाळात



सार्वजनिक बांधकाम विभागाचा अतिक्रमणाचा हातोडा पडू शकतो त्यामुळे हे तात्काळ बांधकाम थांबवा अशी लिखित तक्रार अर्ज दाखल करून अंबाजोगाई येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर डोंगर पिंपळा येथील रणरागिनी सौ जयश्री मधुसूदन केंद्रे यांनी एक जून पासून लाक्षणिक उपोषण आंदोलन चालू केले होते या आंदोलनाची दखल सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई कार्यकारी अभियंता स्वामी,उपविभागीय अभियंता जी. एस. मुंडे , शाखा अभियंता गोविंद शेळके यांच्या पथकाने प्रत्यक्ष पाहणी केली डोंगर पिंपळा येथे नियोजित होत असलेली ग्रामपंचायतची इमारत रोड पासून १८ मीटरवर ◀◀ पान ३ वर

# लोकनेते मुंडे साहेबांचा आज स्मृतीदिन

## भजन, प्रसाद, सामाजिक उपक्रमांचे आयोजन

परळी । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा उद्या स्मृतीदिन असून गोपीनाथ गडावर त्यानिमित्त भजन, प्रसाद आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे, डॉ.प्रीतमताई मुंडे हया परिवारासह उद्या याठिकाणी उपस्थित राहणार आहेत.



**ना. पंकजाताई मुंडे, डॉ. प्रितमताई मुंडे गोपीनाथ गडावर होणार नतमस्तक**

सध्याची परिस्थिती आणि देशावर आलेले संकट पाहता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून यंदा मुंडे साहेबांची पुण्यतिथी आपापल्या गावात व घरीच करण्याचे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी केले आहे, त्यामुळे गोपीनाथ गडावर यंदा भव्य दिव्य कार्यक्रम नसला तरी यादिवशी भजन, प्रसाद व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ना. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे उद्या सकाळी १० वा. गोपीनाथ गडावर पोहोचणार आहेत. याठिकाणी त्या मुंडे साहेबांना आवडणा-या पदार्थाचा नेवैद्य समाधीसमोर अर्पण करणार आहोत. यावेळी आपण एक नवीन संकल्प करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. भाजपचे जिल्ह्यातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी आपल्या लाडक्या लोकनेत्याला अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# ‘मेरी बात’ कार्यक्रमात गोरख शेंद्रे यांचे प्रेरणादायी मनोगत




अंबाजोगाई । प्रतिनिधी

आंतरभारती संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘मेरी बात’ या विशेष कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक, कथाकार, कवी तथा माजी मुख्याध्यापक गोरख शेंद्रे यांनी आपल्या जीवनप्रवासातील विविध अनुभव आणि साहित्य-सामाजिक कार्याचा प्रेरणादायी प्रवास उपस्थितांसमोर उलगडला.

बालक मंदिर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी आपल्या बालपणापासून ते शिक्षक आणि साहित्यिक म्हणून घडत गेलेल्या प्रवासाचा आढावा घेतला. इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतचे शिक्षण परडी-माटेगाव येथे झाले. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही जिद्द, परिश्रम आणि शिक्षणाच्या बळावर त्यांनी शिक्षक म्हणून आपली कारकीर्द घडवली.

◀◀ पान ३ वर




**परळी शहरातील संभाजीनगर पोलीस ठाण्याचे सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व्यंकटराव भताने यांच्या सेवानिवृत्तीनंतर प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. व्यंकटराव भताने यांनी पोलीस दलात ३७ वर्षे सेवा केली.**

# बीड शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता करा; रस्ते, पाणी पुरवठ्याच्या समस्या तत्काळ सोडवा

## भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांची बीडच्या सीओंकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम राबवावी. तसेच, इतर नागरी समस्या तत्काळ सोडवाव्यात, अशी मागणी भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे मंगळवारी (दि.२) केली आहे. यावेळी ज्येष्ठ नेते गणेश वाघमारे, डॉ.रवींद्र घुंबरे, नगरसेवक शुभम धूत, राकेश जाधव, नितीन साखरे, मंगेश धोंगडे, नागेश तांबारे, राहुल गुरखुदे, मुन्ना गायकवाड, मुस्तफा शेख, नंदू पिंगळे, राजेंद्र गुजर यांच्यासह



भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

शहरातील मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविणे, वित्त आयोगाच्या निधीचा नियोजनबद्ध व पारदर्शक पद्धतीने वापर करणे, विद्युत विभागातील प्रलंबित कामे पूर्ण करणे, ◀◀ पान ३ वर

# पाटोदा तहसील कार्यालयाचा ‘सावळा गोंधळ’; पुरवठा विभागात कर्मचाऱ्यांचा तुटवडा, वृद्ध-दिव्यांगांचे हाल!

पाटोदा । प्रतिनिधी

सरकारी कार्यालयांमध्ये जनतेच्या कामांचा निपटारा वेळेत व्हावा यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करते. मात्र, पाटोदा तहसील कार्यालयात सध्या अनागोंदी आणि सावळ्या गोंधळाचे साम्राज्य पाहायला मिळत आहे. अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पुरवठा विभागात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (चझडउ) नियुक्त केलेले दोन हक्काचे लिपिक (क्लर्क) असताना, त्यांची नियुक्ती अन्य ठिकाणी करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, सध्या या विभागाचा कारभार चक्क तहसीलदार साहेबांच्या ड्रायव्हरच्या भरवशावर सुरू असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा संबंधित कर्मचारी १५ दिवस ड्रायव्हर म्हणून कर्तव्य बजावतो, तर उर्वरित १५ दिवस पुरवठा विभागात लिपिक म्हणून काम पाहतो. एकाच वेळी दोन वेगवेगळ्या जबाबदाऱ्या एकाच कर्मचाऱ्या कडून करून घेतल्या जात असल्याने पुरवठा विभागाचा बोजवारा उडाला आहे. यामुळे सर्वसामान्यांची रेशन कार्ड, धान्य वाटप व इतर महत्त्वाची कामे रखडली असून, जनतेची कामे रामभरोसे अशी स्थिती निर्माण झाली आहे.

**तिसऱ्या मजल्यावर कार्यालय, लिफ्ट बंद; वृद्ध अन् दिव्यांगांची फरफट**

एकीकडे कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे कामे होत नसताना, दुसरीकडे तहसील कार्यालयाची इमारत प्रशासनाच्या असंवेदनशीलतेची साक्ष देत आहे. तहसीलचे मुख्य कार्यालय इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आहे. मात्र, कार्यालयात वर जाण्यासाठी असलेल्या लिफ्टची सुविधा बंद असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

यामुळे काठीचा आधार घेणारे वृद्ध, अशक्त नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना आपल्या हक्काच्या कामासाठी पायऱ्या चढून तिसऱ्या मजल्यावर जावे लागत आहे. अनेकदा पायऱ्या चढताना या वर्गाची मोठी फरफट होते, तर काही वेळा अधिकारी जागेवर न मिळाल्यास त्यांना रिकाम्या हाताने, पायपीट करत परत जावे लागते.

**तहसीलदार साहेबांचे दुर्लक्ष की अभय?**

कार्यालयातील हा सावळा गोंधळ उघडच्या डोळ्यांनी दिसत असतानाही पाटोद्याचे तहसीलदार साहेब याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत का? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. आपल्याच ड्रायव्हरला दोन वेगवेगळ्या खुर्च्यांवर बसवून जनतेला वेठीस धरणाऱ्या या कारभारावर तहसीलदारांचे नियंत्रण का नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे. आम्ही आमच्या हक्काच्या कामासाठी पायऱ्या चढून तिसऱ्या मजल्यावर कशाबशा जातो. तिथे गेल्यावर साहेब ड्रायव्हिंगला गेलेत किंवा कामावर नाहीत, असे ऐकायला मिळते. वयाच्या या टप्प्यावर प्रशासनाने आमची अशी थट्टा लावणे अत्यंत क्लेशदायक आहे.

- एक त्रस्त वृद्ध नागरिक

आता तरी जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ प्रशासन पाटोदा तहसील कार्यालयातील या मनमानी कारभाराची दखल घेणार का? पुरवठा विभागाला पूर्णवेळ कर्मचारी देऊन वृद्ध आणि दिव्यांगांसाठी लिफ्टची सोय तातडीने सुरू होणार का? याकडे पाटोदा तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

# लोकनेता गोपीनाथराव मुंडे होईल का कुणी...?



महाराष्ट्राच्या ऐतिहासिक राजकारणाच्या पटलावर बोटांवर मोजण्याएवढे असे धुरंधर राजकारणी होऊन गेले आणि आहेत ज्यांनी आपल्या हयातीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करून देशाच्या राजकारणात स्वतंत्र छाप उमटवली. या धुरंधर मंडळींमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री यशवंतराव चव्हाण, श्री वसंतराव नाईक, लेखक-वक्ते श्री प्र.के.अत्रे, श्री प्रमोदजी महाजन, श्री अटलबिहारी वाजपेयी, हिंदुहृदय सम्राट श्री बाळासाहेब ठाकरे, मा.श्री शरदचंद्रजी पवार, भारताचे विद्यमान पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी आणि याच महानुभावांच्या रांगेतील अगदी सन्मानाने घेतले जाणारे नाव म्हणजे मराठवाड्याचे भूमिपुत्र स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब! ही सर्वच नावे तिसऱ्या जगातील असून यांना राजकारणाचा कोणताही वसा-वारसा लाभला नसतांना स्वत:च्या कर्तृत्वावर यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करून आपापल्या काळावर आपला चिरकाल ठसा उमटवला! ही सगळीच मंडळी उपेक्षित-वंचित परिस्थितीतून येऊन मोठी झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवनच संघर्षात गेले. काही काळ संसदेत काम करण्याची संधी मिळाली असता तिथेही उपेक्षेचे चटके सोसावे लागले परिणामी केंद्रीय कायदे मंत्रीपदाचा राजीनामा देऊन बाबासाहेब मंत्रिमंडळाबाहेर पडले. जवळपास या सर्वच लोकांच्या जीवनात टोकाचा संघर्ष करण्याची वेळ आली आणि त्यांनी ती मोठ्या ताकदीने पेलून आपले अस्तित्व निर्माण केले. याच प्रकारचा खडतर जीवन-संघर्ष लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या वाट्याला आला, परंतु मुंडे साहेब जीवनभर कुठेही न झुकता आपला संघर्ष करत राहिले आणि इतिहासाच्या पानावर त्यांचा अजोड संघर्ष अजरामर राहिला!

**प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये**
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि. परभणी
मो. ९१५८०६४०६८

मराठवाड्याच्या मागास बीड जिल्हातील उसतोड कामगारांच्या डोंगरपट्ट्यातल्या परळी तालुक्यातील नाथ्रा गावात स्वातंत्र्याच्या पहिल्या दशकांत जन्मलेले गोपीनाथ मुंडे म्हणजे संघर्षाचे दुसरे नाव! परळी तालुक्यातील नाथ्रा गावापासून ते युनोमध्ये भारताचे प्रतिनिधित्व आणि भारतीय संसदेत केंद्रीय मंत्रिपदांपर्यंतचा प्रवास काही एवढा सहज आणि एका लेखात लिहिण्यासारखा नक्कीच नाही! अंबाजोगाईच्या महाविद्यालयातून सुरु झालेला मुंडे साहेबांचा प्रवास थक्क करणारा आहे. प्रमोदजी महाजन यांच्यासोबतची मैत्री मुंडे साहेबांच्या जीवनात एवढी अमुलाग्र क्रांती आणेल याची कुणाला तिळभरसुद्धा कल्पना नव्हती! महाजन-मुंडे या महाविद्यालयीन स्तरावरील मैत्रीचे रुपांतर पुढे नात्यात झाले. दुर्दैवाने वयाच्या विसाव्या वर्षी मुंडे साहेबांचे वडिल गेले आणि पुढील शिक्षणाची जबाबदारी सक्षमपणे जेष्ठ बंधू श्री पंडित अण्णानी पेलली. अण्णांनी गावाकडील शेती-बाडी सांभाळून गोपीनाथराव मुंडे साहेबांचे शिक्षण बंद पडू दिले नाही. दुसरीकडे गोपीनाथराव पुणे येथे जनसंघाच्या चळवळीने झपाटून गेले. तेथे श्री वसंतराव भागवतांच्या संस्काराने त्याची देशभक्तीची विचारसरणी दृढ झाली. पुण्यात विद्यार्थी संसदेच्या निवडणुका, नंतर जनसंघ आणि शेवटी भाजपाच्या प्रचारकार्यात मुंडे-महाजन जोडगोळीने प्रवेश केला. शेठजी-भटजींचा पक्ष असा शिक्का बसलेल्या भाजपला पुणे-मुंबई आणि अन्य शहरातून बाहेर काढून विदर्भ, कोकण, मराठवाडा आदि सर्व भागात नेऊन पोहचवण्याचे मूलगामी कार्य मुंडे-महाजन जोडगोळीने मोठ्या हिमतीने केले. बाहेर प्रचार करतांना गोपीनाथराव मुंडेंचे लक्ष आपल्या परळीवर होतेच. १९७८ च्या बीडच्या जि.प.निवडणुकीत अंबाजोगाईच्या उजनी गटातून ते बीड जिल्हा परिषदेवर निवडून आले आणि त्यांनी पुन्हा मागे वळून पहिलेच नाही!

१९८० मध्ये निवडणुका लागल्या आणि तिशीतील गोपीनाथराव मुंडेंनी परळी मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढवली आणि जिंकली सुद्धा! पहिल्यांदाच मराठवाड्यातून आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून भाजपच्या चिन्हावर निवडून येण्याचा सन्मान श्री गोपीनाथराव मुंडेंना मिळाला. त्यानंतर एकावर एक संधी त्यांना मिळत राहिल्या आणि त्यांनी त्या सर्वच संधींचे सोने केले.

पुढे भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष, भाजपचे प्रदेशाध्यक्ष अशा एक ना अनेक संधी त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावर मिळाल्या. या पदांचा फायदा मुंडे साहेबांनी आपल्या पक्षाला मोठ्या प्रमाणात करून दिला. श्रीमंत आणि उच्चभ्रू लोकांमध्ये असलेला शेटजी-भटजींच्या भाजपची पाळेमुळे बहुजन समाजाच्या मनामनात खोलवर रुजविण्याचे श्रेय मुंडे-महाजन जोडगोळीला जाते! गोपीनाथराव मुंडे साहेबांनी राजकारणात अनेक दैवी वरदान असल्यासारखे महान कार्य करून दाखवले. भाजप पक्षांत अठरापगड जातींच्या लोकांना चुंबकासारखे खेचण्याचे काम मुंडेंच्या वक्तृत्व, व्यक्तिमत्व आणि कर्तृत्वाने केले. बहुजन समाजासाठी राजकारणात असलेला अवकाश मोठ्या शिताफीने मुंडे साहेबांनी भरून काढला. साळी-माळी-धनगर-बंजारा-वंजारी-मुसलमान सारखी उपेक्षित वंचित जाती-धर्माच्या लोकांना देशाच्या मुख्य राजकीय प्रवाहात खेचून आणण्याचे महान कार्य गोपीनाथराव मुंडे साहेबांनी केले! एवढेच काय प्रस्थापित मराठा समाजातील उपेक्षित आणि दुर्लक्षित अशा नवनेतृत्वाला भाजपमध्ये संधी देऊन अठरापगड जातींची मजबूत मोट बांधण्याचे महत्कार्य मुंडे साहेबांनी केले. ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26